# ॥ आषाढी एकादशी ॥

वर्ष १२ वे : अंक ४
जुलै २०२६

ब्रह्मतेजो बलंबलम्



हीरकमहोत्सवी
कोल्हापूर चित्पावन संघाचे
मुखपत्र

स्थापना : १९६४
६२
मासिक नवस्नेह
किंमत : २० रु.




प्रेषक
**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**
४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

# कोल्हापूर चित्पावन संघाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा



गुरुवार, दि. ४ जून २०२६ रोजी कोल्हापूर चित्पावन संघाचा वर्धापन दिन उत्साहाने साजरा करण्यात आला. आज आपल्या संघाला ६२ वर्षे पूर्ण झाली. यानिमित्ताने सत्यनारायण पूजा श्री. केदार जोशी यांच्या हस्ते करण्यात आली व सायंकाळी ५ ते ८ वाजेपर्यंत आमंत्रितांना तीर्थप्रसाद देण्यात आला. श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था, ब्राह्मण सभा करवीर (मंगलधाम), कऱ्हाडे ब्राह्मण संघ, श्री परशुराम क्रिकेट समितीचे अध्यक्ष आणि पदाधिकारी तीर्थप्रसादासाठी उपस्थित होते. सर्वांनी संघाची वाटचाल अशीच सुरू राहू देत अशा शुभेच्छा दिल्या. सर्व सभासद आणि हितचिंतक यांनीही तीर्थप्रसाद व अल्पोपहार घेतला व संघाला शुभेच्छा दिल्या. ब्राह्मण सभेचे अध्यक्ष डॉ. दीपक आंबर्डेकर, डॉ. उदय कुलकर्णी, श्री. श्रीराम टोपकर, कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे श्री. धर्मराज पंडित, श्री. मिलिंद पावनगडकर, सौ. विनिता आंबेकर, श्री परशुराम चषक समितीचे श्री. केदार वाघापूरकर, सौ. पद्मजा आपटे, श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष श्री. मुकुंद गोरे, श्री. माधव करंदीकर तसेच उद्योजक श्री. नितीन वाडीकर यांनीही तीर्थप्रसादाचा लाभ घेऊन संघाला शुभेच्छा दिल्या.

# 'मायसावली केअर सेंटर' ला धान्य रूपाने मदत




कोल्हापूर चित्पावन संघाच्या ६२ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून गुरुवार, दि. ४ जून २०२६ रोजी कोल्हापूर येथील 'मायसावली केअर सेंटर' ला कोल्हापूर चित्पावन संघ आणि चित्पावन महिला भिशी ग्रुप यांच्यातर्फे  धान्य रूपाने मदत करण्यात आली. याप्रसंगी दोन्ही संस्थांचे सदस्य आणि संघाचे हितचिंतक उपस्थित होते.

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष १२ वे : अंक ४ : जुलै २०२६**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ.मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984


### अनुक्रम


१) **संपादकीय /४**
२) **अवंतिका गोखले /५** – वैदेही जोशी
३) **माझे वडील 'वेदमूर्ती' /७**
   – सुधाकर गोखले
४) **वैज्ञानिक शोध आणि भारतीय अध्यात्म /८**
   – मीरा साठे
५) **ज्ञानसूर्याची सावली /१०**
   – सौ. मंजुश्री गोखले
६) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी' /१३**
   – सौ. मंजुश्री गोखले
७) **बदलती वैद्यकीय सेवा /१६**
   – कमला हर्डीकर
८) **मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा /१९** – ओंकार गाडगीळ
९) **भारतरत्न लता मंगेशकर/२०**
   – विकास मेहेंदळे
१०) **अवीट गोडीचे गीतरामायण /२४**
   – श्री. सुधीर दाजी जोशी
११) **वधूवर माहिती यादी /२५**



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे, विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०




हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ


मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५



- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष)
9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष)
9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह)
7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह)
8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार)
8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.



**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. ४ वर दिली आहे.**

# संपादकीय...

नमस्कार मंडळी !

पावसानं ओढ दिली आणि वायफाय, इंटरनेट, इन्स्टाग्राम इ. जे काय काय होतं ते मागं पडलं आणि पावसाची चर्चा सुरू झाली ! अगदी 'इंतेहा हो गयी इंतजार की' अशी अवस्था झाली ! पावसाचं पहिलं नक्षत्र मृग कोरडं गेलं आणि न पडलेल्या पाण्यानं सगळ्यांच्या तोंडचं पाणी पळवलं. 'येरे येरे पावसा' म्हणायची वेळ आली. 'तुला देतो पैसा' असं अमिषही त्याला दाखवून झालं. पण आताशा त्यालाही खोटा पैसा चालत नाही आणि आम्हा माणसांना सगळंच खोटं करायची सवय आहे. झाडांची लग्नं लावून झाली, बेडकांचीही लग्नं लावून झाली. पण पाऊस पाघळला नाही आणि पाझरलाही नाही. आता जुलै महिन्यातच काही आशा आहे. हवामाना खात्यानं पावसाचे अंदाज करायचं सोडून दिलं असावं. कारण त्यांचा एकही अंदाज बरोबर येत नाहीय. हे वरूणराजा, माणसानं करायचं तरी काय? झाडं तोडली म्हणून पाऊस पडत नाही म्हणावं तर किती तरी लाख झाडं लावून झाली, तरीही पाऊस रुसलेलाच आहे. आशा करूया की जुलैमध्ये तरी भरपूर पडेल. चिंता तर वाटते आहेच, पण या चिंतेतून थोडासा दिलासा देतोय नवस्नेह. आपली नेहमीची सुंदर सदरे आणि काही नवीन माहितीपूर्ण सदरे घेऊन तुमच्या हाती नवस्नेह जेव्हा पडेल ना तेव्हा काही क्षण चिंता विसरली जाईल. असो.

आपल्या चित्पावन संघाकडून दरवर्षी विद्यार्थी गुणगौरव करण्यात येतो. याही वर्षी तो करण्यात येणार आहेच. बक्षिस किती आहे? काय आहे? यापेक्षा कष्ट करून परिश्रम करून मिळवलेल्या यशासाठी चार चौघांसमोर पाठीवर शाबासकीची थाप पडते हे दिमाखाचं आहे, कौतुकाचं आहे, प्रेरणा देणारं आहे. कौतुक करणारं आहे आणि हे जास्त महत्त्वाचं आहे. खरं ना? म्हणून हा कौतुक सोहळा ! तेव्हा विद्यार्थ्यांनो या कौतुक सोहळ्यात न्हाऊन जा.

कदाचित पावसात भिजायला इतक्यात मिळेल न मिळेल. पण आपण वाट तर बघतोच आहोत ना?

**कितने दिनों से है मुझे**
**उस एक बूँद का इंतज़ार**
**ज़ो मेरे सुखे मन को**
**फिर से सावन बना दे।**

तेव्हा मित्रांनो, विद्यार्थी गुणगौरव कौतुक सोहळा, उशिरा झालेल्या पावसात भिजण्याचा कौतुक सोहळा आणि नवस्नेह कौतुकाने वाचण्याचा सोहळा ! जुलै महिन्यात हे तीन सोहळे आनंददायी ठरणार आहेत ! त्यातच आता तुम्ही दिवाळी अंकासाठी लिहिणार आहात ना ! मग काय? कौतुक सोहळ्यात आणखी भर ! चला तर मग इंतजार करूया पावसाचा आणि नवस्नेहचा पण ! धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,** मो. ८८०५३५५२००

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**युनियन बँक ऑफ इंडिया,**
**महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 641002050000001)**
**IFSC Code : UBIN0564109**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/– मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# अवंतिका गोखले



भारतीय स्वातंत्र्यलढा हा ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीतून देशाला मुक्त करण्यासाठी भारतीयांनी केलेला एक महान संघर्ष होता. अनेक वर्षांच्या त्याग, बलिदान आणि अहिंसक व सशस्त्र चळवळीनंतर स्वातंत्र्य आपल्याला लाभले.

स्वातंत्र्यलढा म्हणजे केवळ राजकीय मुक्ती नव्हती, तर तो भारतीय अस्मितेचा विजय होता. हा इतिहास आपल्याला आपल्या हक्कांची जाणीव करून देतो आणि देशाच्या एकात्मतेचे रक्षण करण्याची प्रेरणा देतो. आज आपण जे मोकळे श्वास घेत आहोत ते या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे फळ आहे.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महिलांचे योगदान अतुलनीय आणि प्रेरणादायी राहिले आहे. त्यांनी केवळ घर सांभाळले नाही, तर पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून सत्याग्रह, मोर्चे आणि क्रांतिकारी चळवळींमध्ये प्राणपणाने लढा दिला. अशा चळवळीत सहभाग घेणाऱ्या अनेक भगिनींपैकीच एक म्हणजे अवंतिका गोखले...

१८८३ साली त्यांचा जन्म इंदूर येथे विष्णुपंत जोशी आणि सत्यभामाबाई या माता-पित्यांच्या पोटी झाला. विष्णुपंत हे मूळचे सातारा जिल्ह्यातील तासगाव येथील होते. अवंतिकाबाईंचे लग्न त्यांच्या वयाच्या ९व्या वर्षी रतलाम येथील बाबुराव गोखले या इंजिनिअरशी झाले. बाबुराव उच्च शिक्षणासाठी परराष्ट्रात जाण्यापूर्वी आपल्या माता-पित्यांना त्यांनी अवंतिकाबाईना शिकण्यासाठी संधी द्यावी, अशी विनंती केली. अवंतिकाबाईनेही एका वर्षात मराठी लिहिणे, वाचणे आत्मसात केले. तसेच इंग्रजीचेही ज्ञान संपादन केले. बाबुराव परराष्ट्रात असताना नर्सिंगचा व्यवसाय किती महत्वाचा आहे याची त्यांना जाणीव झाली. परराष्ट्रातून परतल्यावर त्यांनी अवंतिकाबाईना नर्सिंगचे धडे दिले. १९१३ साली इचलकरंजीच्या राणीबरोबर इंग्लंडला जाण्याची त्यांना संधी मिळाली. तेथील वास्तव्यात इंग्लंडमधील विविध शैक्षणिक तसेच सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना त्यांनी भेटी दिल्या. त्यामुळे त्या खूपच प्रभावित झाल्या. इंग्लंडमधून परत आल्यानंतर मुंबई येथे सेवासदनने सुरू केलेल्या शिक्षणसंस्थेत त्यांनी कामास सुरवात केली. तसेच कष्ट करणाऱ्या स्त्रियांच्यामध्ये मिसळून त्यांच्या जीवनाचा व त्यांच्या विविध समस्यांचा त्यांनी अभ्यास केला.

अवंतिकाबाईंनी चंपारण्यामध्ये मुलांसाठी शाळा सुरू केल्या. त्यापैकी काही आजही आहेत. मुलांना त्या स्वच्छतेचे आणि चांगल्या सवयीचे धडे देत, भजने म्हणावयास शिकवत. शिवाय शेतकरी कामगारांच्यामध्ये त्यांचे काम सतत चालूच होते. यामुळे तेथील लोक त्यांना माताजी म्हणून मानत असत. चंपारण्यामधील सत्याग्रह यशस्वी झाल्यानंतर त्यानी असहकारतेच्या चळवळीत सक्रीय भाग घेतला. खादीवर त्यांचा दृढ विश्वास होता. त्यानी व त्यांच्या पतीने खादी विणण्याचे स्त्रियांना शिक्षण

दिले. बिहारमध्ये बुरखा पद्धत सर्रास होती. स्त्रियांनी बुरखे फेकून द्यावे, यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले.

अवंतिकाबाई या मुंबईला परतल्यानंतर मुंबई कार्पोरेशनच्या महिला सदस्या म्हणून १९२२ ते १९२९ या काळात निवडल्या गेल्या. प्रत्येक बैठकीस त्या उपस्थित राहत. कार्पोरेशनचे कामगार आणि सदस्य यानी खादीच वापरली पाहिजे असे ठराव त्यानी मंजूर करून घेतले. शासनाने त्यांना जस्टीस ऑफ पीस ही मानाची पदवी अर्पण केली. पण अवंतिकाबाईनी ती स्पष्टपणे नाकारली. त्यांच्या या कार्याचे मुंबई कार्पोरेशनचे कमिशनर श्री. कॅटर्न यांना खूप कौतुक वाटत असे. लोकमान्य टिळकांनी अवंतिकाबाईचा गौरव केला होता.

सायमन कमिशनच्या विरोधात निदर्शने करण्याचा ठराव १५ जानेवारी १९२८मध्ये मंजूर करण्यात आला. राष्ट्रीय स्त्री सभेनेही त्याला मंजुरी दिली. या स्त्री सभेमध्ये सरोजिनी नायडू, कुमारी बच्चुबाई लोटलीवाला, रतन मेहता, अवंतिकाबाई जोशी यांनी हरताळ पाळण्याचा निर्णय घेतला. या हरताळाचे नेतृत्व अवंतिकाबाईंकडे होते.

स्त्रियांच्या सहभागाने भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला मोठी गती मिळाली. या लढ्यामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास आणि स्वावलंबनाची भावना निर्माण झाली.

मुंबईच्या आझाद मैदानावर स्त्रियांची मोठी सभा झाली. पोलिसांच्या तुफान माऱ्यापुढेही स्त्रिया हटल्या नाहीत. या सर्व स्त्रियांना पकडून भांडुपच्या जंगलात सोडून देण्यात आले. या त्यांच्या सत्याग्रहाबद्दल अवंतिकाबाईंना सहा महिन्यांची तुरुंगवासाची सजा झाली. शिवाय ४५० रुपये दंडही भरावा लागणार होता. पण त्यानी दंड भरण्याचे नाकारले व ३ महिन्यांची शिक्षा सहन केली. या सत्याग्रहाचा फार मोठा परिणाम राष्ट्रीय चळवळीवर झाला. स्त्रियांना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याची प्रेरणा मिळाली आणि पुरुषांनाही स्त्री शक्तीची जाणीव झाली; हे मोठे यश होय. म्हणूनच अवंतिकाबाई जरी महाराष्ट्रीयन असल्या तरी अखिल भारतीय स्तरावर त्यांना मानवंदना मिळाली.

अशा सर्व कणखर अन् त्यागमयी जीवन जगलेल्या मातांना मनःपूर्वक अभिवादन !

**– वैदेही जोशी,**
मोबा. ९५४५६३५४६५

**दिनविशेष जुलै २०२६ पराभवनाम संवत्सरे** **सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**
**निज ज्येष्ठ-आषाढ १९४८** **श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे। साक्षात लक्ष्मी वसे तिथे।**




**बुधवार दि. १ :** महाराष्ट्र कृषी दिन, चार्टर्ड अकौंटंटस् डे, डॉक्टर्स डे, **शुक्रवार दि. ३ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो. ९.४५ वा.), **शनिवार दि. ४ :** जागतिक सहकार दिन, **मंगळवार दि. ७ :** संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान देहू, **बुधवार दि. ८ :** संत ज्ञानेश्वर माऊली पालखी प्रस्थान आळंदी, **बुधवार दि. १५ :** आषाढ मास प्रारंभ, श्री टेंबेस्वामी पुण्यतिथी, **गुरुवार दि. १६ :** श्री जगन्नाथ रथ यात्रा पुरी, **शनिवार दि. १८ :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुण्यदिन, **शनिवार दि. २५ :** देवशयनी आषाढी एकादशी, **सोमवार दि. २७ :** महाराष्ट्रीय बेंदूर, **मंगळवार दि. २८ :** जागतिक निसर्ग संवर्धन दिन, **बुधवार दि. २९ :** गुरुपौर्णिमा.

# माझे वडील 'वेदमूर्ती'



आम्ही मूळचे कोकणातील असलो तरी आमचे वडील सांगलीत येवून स्थायिक झाले. गोपाळ नारायण ऊर्फ गो. ना. गोखले गुरुजी या नावाने ते सांगलीत सर्वदूर परिचित होते.

राजापूर तालुक्यातील गोवळ हे त्यांचे मूळ गांव. १८९२ साली त्यांचा जन्म झाला. वयाच्या १२ व्या वर्षी त्यांनी घर सोडून राजापूरची वाट धरली. लहानपणापासून वेदविद्येची आवड असलेने राजापूरच्या वेदशाळेत त्यांनी कृष्ण यजुर्वेदाचे धनान्त अध्ययन पूर्ण केले. या काळात त्यांनी माधुकरी मागून आपला उदरनिर्वाह केला. पुढे सांगलीच्या वेदशाळेत उर्वरित अध्ययन पूर्ण केले. लवकरच दशग्रंथी घनपाठी ब्राह्मण म्हणून त्यांची कीर्ती सर्वदूर पसरली. त्यांची विद्वत्ता जाणून सांगलीच्या पटवर्धन राजेसाहेबांनी त्यांना त्याच वेदशाळेवर गुरुजी म्हणून नियुक्त केले. सांगलीमध्ये नेहमी पगडी परिधान करणारे ते एकमेव गृहस्थ होते.

काशीपासून रामेश्वरपर्यंत अनेक नगरातून त्यांनी प्रवास केला. कोल्हापूर, पुणे, इंदूर इ. ठिकाणी त्यांनी वेदाच्या परीक्षा दिल्या. अनेक ठिकाणी त्यांचे सत्कार झाले. प्रत्यक्ष श्रीमद् शंकराचार्य यांनी त्यांना वैदिक रत्न म्हणून मानपत्र देवून त्यांचा गौरव केला. त्यांना वेदमूर्ती अशी पदवीही दिली. काशीच्या पंडितांनी सभा भरवून त्यांना श्रौताचार्य या पदवीने संबोधले. त्या काळी श्रौत विद्येत पारंगत असलेल्या मोजक्या ब्रह्मवृंदात त्यांना मानाचे स्थान होते. श्री क्षेत्र काशी, रामेश्वर, गोकर्ण, इंदूर, ग्वाल्हेर, रामदुर्ग, नागपूर, पुणे, मुंबई, सांगली इ. ठिकाणी त्यांनी जटा-धनाची पारायणे केली. अनेक यज्ञांत त्यांनी अध्वर्यू म्हणून यागांचे संचलन केले. दक्षिणारूपाने त्यांनी धन मिळवले तरी त्यांनी धनसंचय केला नाही. उलट अनेक गोरगरिबांना यथाशक्ती मदत केली. आमच्या मातोश्री कै. राधाबाई गोखले ऊर्फ मामी यांनी जराही कुरकुर न करता सर्व प्रपंच सांभाळला.

नारिंग्रे, ता. देवगड येथे देवीस्थापनेच्या कामी गेले असताना तेथेच त्यांचे वयाच्या ६३ व्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या शिष्यांनी सोवळे नेसून त्यांचेवर अंत्यसंस्कार केले. त्यांच्या स्मृतीस आमचे असंख्य प्रणाम !

**– सुधाकर गोखले, कोल्हापूर**

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत. तसेच ज्यांना नवस्नेहचा अंक मिळाला नसेल त्यांनी संघ कार्यालयात कळवावे. त्यांना अंकाची पीडीएफ व्हॉटस्ॲपवर पाठविली जाईल.**

# वैज्ञानिक शोध आणि भारतीय अध्यात्म

इरविन श्रोडिंगर हे एक महान शास्त्रज्ञ होते. क्वांटम भौतिकीचा त्यांना जनक मानतात. पण एवढा मोठा वैज्ञानिक असूनही त्याला विज्ञानाची कोडी सोडवायला आपल्या उपनिषदांचा आधार घ्यावा लागला. आपल्याकडच्या 'अद्वैत' विचाराने तो मनापासून भारावून गेला होता. अद्वैत म्हणजे काय? तर दोन नसणे, म्हणजेच हे संपूर्ण जग एकच असणे. माणसाचं 'मी' (स्वतः) आणि हे 'ब्रह्मांड' वेगळं नाही, तर एकाच मोठ्या शक्तीचे आपण सगळे भाग आहोत, असं तो ठामपणे मानायचा.

**तत्त्वमसि म्हणजे काय?**

आपल्या उपनिषदांमध्ये एक महावाक्य आहे-तत्त्वमसि. याचा साधा अर्थ होतो, ते तूच आहेस. या उपनिषदातील वाक्याने त्यांना अतिशय प्रभावीत केले. भारावून आपल्या 'What is Life?' पुस्तकात लिहिलंय की, आजचं विज्ञान ज्या निसर्गाच्या एकतेचा शोध घेतंय, ते आपल्या पूर्वजांनी खूप वर्षांपूर्वीच सांगून ठेवलंय. शोध घेणारा वैज्ञानिक आणि ज्या जगाचा शोध घ्यायचा आहे, हे दोन्ही वेगळे नसून एकच आहेत, हे त्याने मान्य केलं होतं.

**निरीक्षक हाच निरीक्षणाचा विषय आहे. (The observer is the observed.)**

याचा अर्थ अतिशय गहन आहे. आपण सामान्यतः असे मानतो की मी आणि माझे विचार, मी आणि माझा राग, मी आणि माझी भीती हे दोन वेगळे आहेत. त्यामुळे आपण म्हणतो, मला माझा राग नियंत्रित करायचा आहे, मला भीतीपासून मुक्त व्हायचे आहे. पण कृष्णमूर्ती म्हणतात की, हा एक भ्रम आहे.

जेव्हा राग निर्माण होतो, तेव्हा रागाकडे पाहणारा मी आणि राग हे दोन वेगळे नसतात. तो मी स्वतःच त्या रागाचा, त्या स्मृतींचा, त्या अनुभवांचा बनलेला असतो. म्हणूनच निरीक्षक आणि निरीक्षणाचा विषय यांच्यातील भेद हा मनाने निर्माण केलेला असतो. जोपर्यंत मी स्वतःला रागापासून वेगळे समजतो, तोपर्यंत संघर्ष निर्माण होतो. पण ज्या क्षणी हे दिसते की मीच तो राग आहे, मीच ती भीती आहे, मीच ती इच्छा आहे, त्या क्षणी निरीक्षक आणि निरीक्षणातील अंतर नाहीसे होते. त्या जागरूकतेत संघर्ष संपतो आणि समज निर्माण होते.

जो स्वतःला दुःखाचा साक्षीदार समजतो, त्याने अजून दुःखाला पूर्ण पाहिलेले नसते; कारण शेवटी निरीक्षक आणि निरीक्षण, ज्ञाता आणि ज्ञेय, पाहणारा आणि दिसणारे - हे दोन नसून एकाच चैतन्याच्या लाटा आहेत.

श्रोडिंगरने माणसाला समजेल असा एक सोपा प्रयोग सांगितला होता. समजा एका पेटीत एक मांजर बंद आहे. जोपर्यंत आपण पेटी उघडून पाहत नाही, तोपर्यंत ती मांजर जिवंतही असू शकते आणि मेलेलीही असू शकते. आपण जेव्हा पेटीकडे बघतो, तेव्हाच तिची नक्की अवस्था कळते. याचा अर्थ, आपल्या बघण्यामुळेच गोष्टींना नक्की रूप मिळतं. अद्वैत तत्त्वज्ञान पण हेच सांगतं की, हे जग अनेक शक्यतांनी भरलंय आणि आपल्या मनाच्या बघण्यामुळेच त्याला आकार येतो. बघणारा आणि दिसणारी वस्तू वेगळी नाही.

विज्ञानात 'क्वांटम एंटँगलमेंट' नावाचा एक अजब नियम आहे. यात दोन अतिशय बारीक कण एकमेकांपासून कितीही दूर, अगदी करोडो किलोमीटर लांब असले, तरी ते आतून एकमेकांशी घट्ट जोडलेले असतात. एका कणात बदल केला की दुसऱ्या कणात त्याच सेकंदाला लगेच बदल होतो. तिथे अंतर किंवा वेळ नडत नाही. आपल्या अद्वैत तत्त्वज्ञानात यालाच 'एकता' म्हणतात. आपण वरवर वेगवेगळे दिसलो, तरी सूक्ष्मतम पातळीवर आपण सगळे एकाच वैश्विक धाग्याने बांधलेले आहोत. हा विज्ञानाचा शोध म्हणजेच आपल्या अद्वैत विचारांचा

जिवंत पुरावा आहे.

या सगळ्या प्रवासात आपल्याकडून एक मोठी चूक झाली आहे. आपण आपले श्रुति ग्रंथ म्हणजे वेद आणि उपनिषदांचा मार्ग सोडला. हा मार्ग स्वतःला ओळखण्याचा होता, जो अत्यंत कठीण आणि बुद्धीची मागणी करणारा होता. आपण तो कठीण मार्ग सोडून दिला. आपण केवळ कर्मकांड आणि कोरड्या संस्कारांनाच धर्म मानण्याची चूक केली. एकेकाळी पाश्चात्य जगही अशाच कर्मकांडात अडकले होते, पण त्यांनी त्यातून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न केले. आपण मात्र मूळ ज्ञान विसरून गेलो.

आज जेव्हा आपण धर्माबद्दल बोलतो, तेव्हा आपल्या डोळ्यांसमोर देवळे, पूजा, व्रते, उपवास, संस्कार आणि विविध कर्मकांडे उभी राहतात. पण एक प्रश्न क्वचितच विचारला जातो-धर्म इतकाच आहे का? कारण ज्या भूमीने उपनिषदे निर्माण केली, ज्या भूमीने नचिकेत्यासारख्या बालकाला मृत्यूच्या रहस्यावर प्रश्न विचारण्याचे धैर्य दिले, त्या भूमीचा धर्म केवळ विधी-विधानांपुरता कसा मर्यादित झाला?

श्रुतींचा मार्ग हा मुळात स्वतःला जाणण्याचा मार्ग होता. तो प्रश्न विचारण्याचा मार्ग होता. ब्रह्म काय आहे?, आत्मा काय आहे?, मी कोण आहे? या प्रश्नांपासून भारतीय तत्त्वज्ञानाची सुरुवात झाली. पण प्रश्न विचारणे अवघड असते. त्यासाठी बुद्धी लागते, धैर्य लागते, स्वतःच्या समजुतींवर संशय घेण्याची तयारी लागते. त्याच्या तुलनेत कर्मकांड सोपे असते. ते निश्चित असते, सुरक्षित असते. काय करायचे हे आधीच ठरलेले असते. म्हणून हळूहळू आपण सत्याच्या शोधापेक्षा परंपरेच्या पालनाला अधिक महत्त्व द्यायला लागलो.

धर्माचा केंद्रबिंदू आत्मशोधातून सरकत बाह्य आचारांकडे गेला. विचारांची जागा विधींनी घेतली. अनुभवाची जागा अनुकरणाने घेतली. आणि मग एक अशी व्यवस्था निर्माण झाली जिथे प्रश्न विचारणारा माणूस धोकादायक वाटू लागला, पण प्रश्न न विचारता परंपरा पाळणारा माणूस धार्मिक समजला जाऊ लागला.

मध्ययुगीन अस्थिरतेच्या काळात समाजाने स्वतःचे संरक्षण करण्यासाठी परंपरांना घट्ट पकडून ठेवले. पण संरक्षण आणि बंदिस्तपणा यात एक सूक्ष्म फरक असतो. परंपरा जपताना आपण तिच्या मागील जिवंत तत्त्वज्ञानालाच विसरलो. प्रकाश हरवला आणि सावल्या उरल्या. मग सावल्यांची पूजा सुरू झाली.

आज आपल्याला कर्मकांड सोडून द्यायची गरज नाही; पण त्यांचे स्थान समजून घ्यायची गरज आहे. प्रतीकाला सत्य समजण्याची चूक थांबवावी लागेल. संस्कार जर अंतर्मुखतेकडे नेत नसतील, तर ते केवळ सवय बनून राहतात. पूजा जर जागृतीकडे नेत नसेल, तर ती केवळ कृती उरते. धर्म जर स्वतःला जाणण्याच्या दिशेने नेत नसेल, तर तो धर्म नसून मानसिक आधारव्यवस्था ठरतो.

आपली सर्वात मोठी चूक हीच झाली की आपण प्रकाश झाकून ठेवला आणि त्याच्या सावलीलाच धर्म समजू लागलो. उपनिषदांनी ज्याकडे बोट दाखवले, त्याकडे पाहण्याऐवजी आपण त्या बोटाचीच पूजा करण्यात रमलो. आणि म्हणूनच आज पुन्हा श्रुतींकडे परत जाण्याची गरज आहे-ग्रंथ म्हणून नव्हे, तर जिज्ञासा म्हणून; परंपरा म्हणून नव्हे, तर सत्याच्या शोधाची जिवंत प्रेरणा म्हणून.

थोडक्यात सांगायचं तर, वैज्ञानिक शोध आणि भारतीय अध्यात्म हे एकमेकांच्या खूप जवळ आहे. ते एकाच सत्याला दोन वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयत्न आहेत. भौतिकशास्त्र बाहेरच्या जगाचा शोध घेतं आणि उपनिषदं माणसाच्या आत डोकावतात. जगातला हा वेगळेपणा फक्त एक आभास (माया) आहे. मूळ पातळीवर सगळी एकच ऊर्जा आहे, हेच विज्ञानाने आणि आपल्या ऋषीमुनींनी सिद्ध केलं आहे.

**– मीरा साठे**

### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

### (लेखांक एकेचाळिसावा)

लौकिक अर्थानं, पारमार्थिक अर्थानं, आध्यात्मिक अंगानं आणि ज्ञानसंपादनानं ही चौघंही मोठी होत होती; पण ती जितकी समाजाभिमुख होत गेली, तितका त्यांचा 'स्व'शी संवाद वाढत होता. स्वअध्ययन वाढत होतं. सोपानाही त्याला अपवाद नव्हता. उलट ज्ञानादादा जेवढा अधिकाधिक समाजाभिमुख होत होता. सोपान तेवढाच अंतर्मुख होत होता. अध्यायी बनत होता. स्व-संवेदी बनत होता.

एक मात्र झालं, की ज्ञानादादाची कीर्ती सर्वदूर पसरली आणि त्याला भेटायला येणाऱ्यांची वर्दळ सुरू झाली. आसपासच्या गावातले प्रतिष्ठित आणि भगवद्भक्त यांच्याबरोबरच अगदी सामान्यातल्या सामान्य माणसांपर्यंत सगळ्यांना ज्ञानादादाला भेटायचं असायचं. त्याच्याबरोबरच ती सगळी जण निवृत्तीदादाला, सोपानाला आणि मुक्ताईलाही भेटत.

यातच एक दिवस पंढरपुराहून नामदेव म्हणून कोणी भेटायला आले. हे नामदेव मोठे भगवद्भक्त होते. त्यांना विठ्ठलाचा सखा म्हणत असत. उंच, शिडशिडीत बांध्याचे, पगडी घालणारे, निर्मळ मनाचे नामदेव दामाशेटींचे चिरंजीव होते. त्यांच्या घरात वारी होती. भक्त पुंडलिकानं स्थापित केलेला वारकरी धर्म ते पाळत असत. म्हणूनच जाती-धर्माच्या पलीकडे त्यांचे विचार होते. सर्वसमावेशक असलेला, 'वसुधैव कुटुम्बकम्' मानणारा वारकरी धर्म, म्हणजे विठ्ठलभक्तांची मिरास होता; पण भक्त पुंडलिकाच्या महानिर्वाणानंतर हा वारकरी धर्म काहीसा पुसट झाला होता. त्यातच चक्रधरांच्या महानुभाव पंथानं जोर धरला होता. त्यामुळे या वारकरी संप्रदायाला, भागवत धर्माला काहीशी उतरती कळा लागली होती. खरंतर घराघरात वारकरी होते. घराघरांत विठ्ठलभक्त होते; पण त्यांची एकतानता नव्हती. एकसंघता नव्हती. ज्ञानादादाची कीर्ती वाढत होती. त्याला भेटायला येणाऱ्यांची वर्दळही वाढत होती. चर्चा-उपचर्चा होत होती. वाद-संवाद होत होते. प्रश्न-उत्तरं झडत होती; पण यातून ठोस काहीतरी पुढे येत नव्हतं. म्हणून ज्ञानादादा अस्वस्थ होता. ती त्याची अस्वस्थता सोपानानं ओळखली.

एके दिवशी रात्री जेवणं झाल्यावर चौघं जण अंगणात चांदण्यात बसले होते आणि सोपानानं विचारलं, ''ज्ञानादादा, गेले कित्येक दिवस मी पाहतोय, तू अस्वस्थ आहेस. विमनस्क आहेस. काही घडलंय का?'' सोपानाच्या स्वरात चिंता होती. ज्ञानादादा किंचित हसला, म्हणाला, ''नाही रे सोपाना, तसं विशेष काही नाही; पण काहीतरी मोठं, काहीतरी ठोस असं समाजाच्या कल्याणाचं काही घडत नाहीये. सनातन वैदिक धर्मानं कर्मकांडाचा केलेला अतिरेक सामान्यजनांचा छळ करतोय. मनात असूनही त्यांना देवभक्ती करता येत नाही. त्यांचा कोंडमारा होतोय आणि ते बघून माझा जीव घुसमटतोय. असं काहीतरी करायला पाहिजे, की ज्यायोगे या समाजातले जातिभेद, धर्मभेद तर मिटतीलच; पण या कर्मकांडांना टाळून त्यांना देवभक्ती करता येईल; पण काय करावं सुचत नाहीय. म्हणून मी थोडासा अस्वस्थ आहे. असो, पण सोपाना, तू दोन दिवसांपूर्वी मला काहीतरी सांगणार होतास. या भेटीला येणाऱ्या मंडळींमुळे मला तुझ्याशी निवांत बोलताच आलं नाही. काय सांगणार होतास तू?'' ज्ञानादादानं विचारलं आणि सोपानाला एकदम आठवलं. उत्साहित स्वरात तो म्हणाला,

''बसवेश्वर! श्री गुरू बसवेश्वर ! दादा शतकापूर्वी बसवेश्वर नावाच्या महात्म्यानं लिंगपूजेचं महत्त्व विशद केलं आणि वीरशैव पंथाला नवी दिशा दिली. चक्रधर स्वामींनी महानुभव पंथाची स्थापना करून एक नवीन संप्रदाय समाजात रूढ केला. ते वाचत असताना दादा, मला एकदम असं वाटलं, की असं काहीतरी नाही का घडू शकत? हेच मी तुला सांगणार होतो!'' सोपानाचं बोलणं ऐकून ज्ञानादादाचे डोळे चमकले. चेहऱ्यावर प्रसन्न हास्य उमटलं. सापडला सोपाना, मार्ग सापडला! काहीतरी ठोस, मजबूत, कायमस्वरूपी टिकणारं असं करण्याचा मार्ग सापडला! सोपाना, मार्ग सापडला! माझ्या मनातला अंधार नष्ट झाला आणि तिथं स्वच्छ सूर्यप्रकाश पसरलाय!'' ज्ञानादादाचा उत्साह ओसंडून वाहत होता. सोपानालाही आनंद झाला. तोच ज्ञानादादा म्हणाला, ''ठरलं सोपाना, ठरलं! भक्तश्रेष्ठ पुंडलिकानं स्थापन केलेला वारकरी संप्रदाय जो आज काहीसा झाकोळून गेलाय, त्याला आपण पुन्हा उजाळा देऊ या!'' भगवान श्रीकृष्णानं भगवद्गीतेत सांगितलेली 'वसुधैव कुटुम्बकम'ची संकल्पना आपण समाजात रूढ करू या. वारकरी संप्रदायाला प्रतिस्थापित करणारा भागवत धर्म आपण पुनरुज्जीवित करू या. नव्यानं उजळू या. ठरलं सोपाना ठरलं! या सनातन वैदिक धर्मसंस्थेला सुधारणंचं वावडं आहे. धर्मशास्त्राप्रमाणे कर्मकांड हेच आणि हेच त्याचं ध्येय आहे. त्यात कालानुरूप परिवर्तन करायला ते तयार नाहीत. ठीक आहे! तर मग आपण भागवत धर्माच्या झेंड्याखाली एकत्रित येण्याचं बहुजन समाजाला आवाहन करू या. धर्म, पंथ, वंश, जात या पलीकडे जाणारा मानवधर्म हाच आपल्या आवाहनाचा विषय असेल. आता जे काही करायचं, ते या मानवधर्मासाठीच! या मानवधर्माला नजरेसमोर ठेवूनच! सोपाना, आपल्याला आपलं उद्दिष्ट गवसलंय! जगण्याचं कारण सापडलंय! जीवितकार्य सापडलंय!'' ज्ञानादादा उचंबळून बोलत होता. त्याच्या प्रसन्न चेहऱ्यावरून आनंद ओसंडून वाहत होता. सोपानाचे खांदे धरून त्याला गदागदा हलवत ज्ञानादादा बोलत होता. त्याचं ते हर्षभरित रूप सोपान आपल्या नजरेनं साठवत होता. कितीतरी दिवसांनी, आज कितीतरी दिवसांनी ज्ञानादादाचा असा प्रसन्न चेहरा सोपाना बघत होता. ईप्सित साध्य गवसल्याचा जणू त्याला आनंद झाला होता. त्याच्या प्रसन्नतेनं सोपानही प्रसन्न झाला. अतिप्रसन्न झाला. त्याच प्रसन्नतेनं त्याला झोप लागली.

दुसरे दिवशीची सकाळ मोठी प्रसन्न होती. पंढरपूरहून नामदेव, जनाबाई आणि त्यांच्यासोबत चोखोबा, सावता, गोरोबाकाका इत्यादी मंडळी आली. निवृत्तीदादानं त्यांचं स्वागत केलं. संतांचा हा मेळा आपल्या अंगणात जमलेला बघून सगळ्यांना अतिशय आनंद झाला. मुक्ता त्यांचं आगतस्वागत करण्यात गुंगली, तर जनाबाई लगेच तिच्या मदतीला धावल्या. सगळ्यांनी निवृत्तीदादा, ज्ञानादादाच्या चरणांवर डोकं ठेवून त्यांना नमस्कार केला. सोपानाला गळामिठी घालून त्याची उराउरी भेट घेतली. सगळी मंडळी झोपडीच्या अंगणात गोल करून बसली. तोवर मुक्तानं जनाबाईंच्या मदतीनं बनवलेले दहीपोहे द्रोणांतून भरून आणून प्रत्येकाच्या समोर ठेवले. बरोबर भाजलेल्या शेंगा होत्या. लसूण-मिरचीचा ठेचा होता. असा सगळा बेत बघून संतमंडळीही आनंदली. खाता-खाता गप्पांना जोर आला. वेगवेगळे विषय निघू लागले. तोच चोखोबांनी भीत-भीत विचारलं, ''माउली, एक गोष्ट इचारायची आहे. तुमची आज्ञा असंल, तर इचारीन म्हणतो!'' चोखोबाचा किंचित भ्यायलेला स्वर, प्रश्न विचारतानाची संकोचली अवस्था, तरीही नजरेतली उत्सुकता बघून त्यांना काय विचारायचे आहे, हे ज्ञानादादानं ओळखलंच. ''चोखोबा, मला समजलंय तुम्हाला काय विचारायचं आहे ते? आम्ही ब्राह्मण असूनही विटाळ मानीत नाही, स्पृश-अस्पृश्यता हा भेद पाळत नाही, तुम्हा सर्वांसवे बसतो, बोलतो, खातो, जेवतो, हे कसं काय? असंच ना तुम्हाला विचारायचं आहे?'' चोखोबांनी मूकपणे होकारार्थी मान डोलावली. ज्ञानादादा पुढे म्हणाला. ''मंडळी, आज हेच तुम्हाला सांगण्यासाठी मी उत्सुक आहे.

खरंतर मी हे वेगळं किंवा वेगळेपणानं सांगायची गरजच नाही. कारण ते तुमच्याजवळच आहे. तुमचंच आहे. फक्त त्याची तुम्हाला जाणीव नाही किंवा माहिती नाही. म्हणूनच ते मी तुम्हाला सांगावं, असं त्या गोपालकृष्णाच्या मनात असावं. नामदेवा, इथं तुम्ही जे सगळी जमला आहात, त्या सर्वांच्या घरी पंढरीची वारी करण्याची प्रथा आहे ना? परंपरा आहे ना? मग हे सगळं तुम्हाला नक्की समजेल. ते समजलं, की मात्र ती एका नव्या युगाची नांदी ठरेल. एका नव्या युगाची सुरुवात असेल!''

ज्ञानादादा बोलत होता आणि सगळ्यांचं अवधान जणू ज्ञानादादाच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या शब्दांवर एकवटलं होतं. शांतता इतकी होती, की शेवग्याच्या झाडाचं पानं पडलं, तरी आवाज ऐकू येईल आणि त्या शांततेत केवळ ज्ञानादादाचाच पार अगदी हृदयापर्यंत पोहोचणारा, स्नेहसुधा वर्षणारा आवाज ऐकू येत होता. सोपान एकटक ज्ञानादादाकडे पाहत होता. 'योगसामर्थ्याची अपरिमित साक्ष असलेला दादा प्रत्येक वेळी वेगळाच भासतो.' सोपानाच्या मनात आलं आणि त्याला आठवला काही दिवसांपूर्वीचा प्रसंग !

महान हटयोगी चांगदेव भेटायला येत आहेत असा निरोप आला. त्यांच्या अमाप भक्तगणांसह ते येत असून, ते स्वतः वाघावर स्वार आहेत, हे कळल्यावर मुक्ता म्हणाली होती, ''दादा, ते वाघांवर बसून येत आहेत, मग आपण त्यांना पायी-पायीच सामोरं जायचं?'' हा संवाद चाललेला असताना चौघंही जण एका घराच्या पडक्या भिंतीवर बसले होते. दादा म्हणाला होता, ''बरोबर आहे मुक्ते तुझं! आपण या भिंतीवरच स्वार होऊन जाऊ या!'' आणि त्यानं भिंतीला आदेश दिला होता. ''चल बाई. आम्हाला घेऊन चल!'' आणि ती भिंत चालू लागली होती! ते बघून चांगदेव दादाला शरण आले होते. सर्वांना आश्चर्य वाटलं होतं, पण निवृत्ती-सोपान-मुक्ता शांत होते. या देहामध्ये चैतन्य नसेल, तर तो देह, तो अचेतन देह एखाद्या भिंतीप्रमाणेच असतो; पण त्यात प्राणतत्त्व भरलं, चैतन्य भरलं, की तो देह सचेतन होतो आणि सर्व क्रिया करू लागतो. तद्वतच अचेतन असलेल्या त्या भिंतीमध्ये, जड असलेल्या त्या भिंतीमध्ये चेतना भरल्यावर ती जड भिंतही सचेतन झाली आणि चालू लागली. प्राणतत्त्वाचं हे सामर्थ्य चौघंही जाणून होते; पण ज्ञानादादानं योगशक्तीवर विलक्षण सामर्थ्य मिळवलं होतं. म्हणूनच त्या अचेतनं भिंतीमध्ये तो चैतन्य भरू शकला. अर्थात ज्ञानादादाच्या योगसामर्थ्याची ही साक्ष तर होतीच; पण हटयोगावर प्रचंड हुकूमत असूनही केवळ अहंकारानं ती विद्या काळवंडलेला चांगदेवांच्या अहंकारावरचा तो उताराही होता !

''काय सोपाना, तुझं काय म्हणणं आहे यावर?'' ज्ञानादादाच्या या प्रश्नानं सोपान भानावर आला. त्याचं मन एकीकडे विचार करत असलं, तरी त्याची बुद्धी ज्ञानादादाच्या बोलण्याकडे लागलेली होतीच. म्हणूनच ज्ञानादादाच्या प्रश्नाला सोपानानं अचूक आणि नेमकं उत्तर दिलं, ''ज्ञानादादा, भक्तिसंप्रदायाला, भगवद्भक्ताला, त्याच्या भक्ती परंपरेला एक वेगळं अधिष्ठान यातून मिळणार आहे, हे निश्चित! तेव्हा तुझा हा विचार अत्यंत नेमका आणि सयुक्तिक आहे.'' सोपानाचं उत्तर ऐकलं आणि तिथं जमलेली संतमंडळी चकित झाली. सोपान वेगळ्या विचारात होता, हे त्यांनी पाहिलं होतं. तरीही त्यानं माउलीच्या प्रश्नाला नेमकं सयुक्तिक उत्तर कसं दिलं, याचं त्यांना नवल वाटलं. तोच ज्ञानादादा म्हणाला, ''उत्तम! सोपाना, तू अगदी माझ्या मनातलं बोललास. तेव्हा आता ठरलं! भगवद्भक्ताला आणि वारकरी परंपरेला एक वेगळं अधिष्ठान मिळवून देण्यासाठी योग्य ठिकाण पंढरपूर! श्रीविठ्ठलाच्या रूपातला तो गोपालकृष्णही तिथं आहे. त्याच्या संमतीनं आणि साक्षीनं हे साध्य करू या!'' ज्ञानादादानं समारोप केला आणि पुन्हा एकवार गळाभेट घेऊन मंडळींनी एकमेकांचा निरोप घेतला, तो पुढची भेट पंढरपुरात, असा निश्चय करूनच! (क्रमशः)

**- सौ. मंजुश्री गोखले,**
मोबा. ८८०५३५५२००

# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे.

**– व्यवस्थापक**

**अध्याय ९ : राजविद्या राजगुह्ययोग**

**अत्यंत दुराचारी असती । जे एकचित्तें मज भजती ।**
**तेचि साधु म्हणिजेती । तेचि भक्त बरवें जाण ।।**
असो मोठा दुराचारी भजे मज अनन्य जो ।
मानावा तो जसा साधु त्याचा सुंदर निश्चय ।।३०।।

**तो तात्काळ धर्मात्मा होउनि । निरंतर शांतितें पावोनी। अर्जुना माझी भक्ति जाणोनी । नाश नाहीं तयासी ।।**
शीघ्र तो होय धर्मात्मा शांति शाश्वत मेळवी ।
जाण निश्चित तूं माझा भक्त नाश न पावतो ।।३१।।

**स्त्री वैश्य शुद्र आदिकरुनी । पापयोनी असोनी ।**
**माझी भक्ति केली यांनी । तयासि परमगति जाण ।।**
धरूनि आसरा माझा भोळे स्त्री–वैश्य–शूद्र हि ।
कीं पाप–योनि जे जीव ते हि मोक्षास पावती ।।३२।।

**या परीस ब्राह्मण पवित्र पुण्यवंत । राजर्षि हे समस्त । माझे भक्त मज पावत । तयासी संदेह नाहीं ।।**
तेथें ब्रह्मर्षि राजर्षि ह्यांची गोष्ट कशास ती
भज तूं मज आलास लोकी दु:ख–द नश्वर ।।३३।।

**माझें ठायीं अंत:करण । भक्तिरूप मज अर्पण ।**
**मज उद्देषें याग करून । नमस्कार तो ही मज करी ।।**
**या कारणें हे तू सत्य जाण । हा लोक दुष्टरूप पावोन।**
**हें अनित्य ऐसें जाणोन । माझे भजन करिती ।।**
**माझें चिंतन माझें भजन । माझें करी वाचें नामस्मरण ।**
**सदा श्रवणी माझी कीर्ति श्रवण । नित्य करी अर्जुना।।**
**करें माझें पूजन करी । चरणें माझी यात्रा तीर्थे करी ।**
**मन माझें ठायी धरी । नेमस्त ठेवी मत्स्वरूपी ।।**
**ऐसी निरंतर करी भक्तिसी । अर्जुना येणे करूनि तूं तरसी । या मोहातें नाशिसी । मज तत्पर होउनिया ।।**
**अर्जुना हा लोक दृष्ट पावोन । या कारणें भक्ति करी जाण ।**
**तुझे कल्मष सर्व नासून । पद पावसी परम जें ।।**
**येणें करुनी मज पावसी । मी आत्मा ऐसे जाणसी ।**
**योगयुक्त होसी । मज परायण ।।**
**ऐसें गुह्य जाण । अर्जुनाप्रति सांगे श्रीकृष्ण ।**
**सोपान म्हणे श्रोतिया लागून । सादरें श्रवण करावे ।।**
प्रेमानें ध्यास घेउनि यजीं मज नमीं मज ।
असे जोडूनि आत्म्यास मिळसी मज तत्पर ।।३४।।

इति श्रीमद्‌भगवद्‌गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां
योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे राजविद्या
राजगुह्ययोगोनाम नवमोऽध्याय: ।।९।।
श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

# मुलांचे पान



» चित्र रंगवा



## » फरक ओळखा



## » ठिपके जोडून चित्र तयार करा





# मनाला खुपणारं कागदावर

# बदलती वैद्यकीय सेवा

## (लेखांक १२)

वयाची १० वर्षे पूर्ण होईतोवर आम्ही कृष्णा नदीच्या काठी असलेल्या एका छोट्याशा गावात रहात होतो. कृष्णेचं प्रदूषणविरहीत स्वच्छ पाणी, जवळच असलेल्या मळ्यांतली ताजी भाजी, तिन-त्रिकाल घरात बनवलेलं खाणं यामुळं असेल पण लहानपणी आजारी पडल्याचं आठवत नाही. आम्ही सहा भावंडं, आई-वडिल, आजोबा असे रहात होतो. पोटभर जेवायचं, अंगभर खेळायचं, वर्षातून एकदा वैद्यशास्त्र्यांनी दिलेलं जंताचं औषध रात्री झोपताना घ्यायचं आणि सकाळी उठल्यावर मोठे दोन चमचे एरंडेल घेऊन वर गरम पाणी पिणे, हा एक मोठा साग्रसंगीत कार्यक्रम पार पडायचा. सहा भावंडं यामुळं शाळेला सुटी पडली की एक आठवडा असाच संपायचा. आज हे सारं आठवून हसायला येतं. आजकाल जंताचं औषध घेणं किती सोपं झालं आहे. जवळच्या औषधाच्या दुकानातून गोळी आणायची, तिची चव कळायच्या आधी पाण्याच्या घोटाबरोबर गिळायची. कधीतरी चुकून पोट बिघडलं तर तूप, गूळ, सुंटेचं चाटण खायचं. बेलफळ किंवा डाळिंबांच्या सालीचं औषध घेतलं की बघता बघता पोट बरं होऊन उड्या मारायला मोकळे; पण आजही त्या औषधाची चव आठवली तर तोंड कडू होतं. अर्थात सुंठेच्या चाटणाची चव छानच असायची. आता मात्र पोट बिघडलं तर गोळी आणा आणि गिळा. सहज सोपं काम.

१९४६ साली आमच्याच गावातील एका शिक्षकांचा मुलगा डॉक्टर होऊन गावात आला. सुरुवातीला त्यांनी राहत्या घरीच आवश्यक साहित्यासह दवाखाना सुरू केला. आमच्या घराला अगदी लागूनच त्यांचं घर होतं. बऱ्याच वेळा खिडकीतून हाक मारून संवाद साधला जाई. १९४७ सालचा मे महिना. माझ्या मोठ्या भावाला नाग चावला. तो जोरात ओरडला आणि त्याने आईला मोठ्यांदा हाक मारून सांगितले. हा माझा भाऊ अनेक वेळेला साप पकडायचा, मारायचा. त्यामुळे तशाही अवस्थेत त्याने कोपऱ्यात उभे करून ठेवलेले मुसळ घेऊन सापाला अर्धमेला केला होता. भावाचा आवाज डॉक्टरांच्या कानावर गेला. तातडीने वैद्यकीय साधनांची पेटी घेऊन डॉक्टर आमच्याघरी आले. ज्या पायाला घोट्याच्या किंचित वर साप चावला होता, तो पाय गुडघ्याच्या खाली कापडाने अगदी घट्ट बांधला आणि साप चावल्या जागी योग्य प्रकारे निर्जंतुक सुरीने लहान कट घेऊन थोडं रक्त जाऊ दिलं. पाणी मारून ते त्याला जागं ठेवत होते. डॉक्टरांच्या प्रयत्नांना यश आलं. काय करायचं या सूचना देऊन जवळजवळ दीड तासाने डॉक्टर घरी गेले. माझ्या भावाचं तरुण वय, आयुष्याची बळकट दोरी आणि सापाच्या दंशातून पुरेसं विष शरीरात कदाचित गेलं नसेल, पण ५-६ तासांत माझा भाऊ ताजातवाना झाला. इथे मला मुद्दाम हे नमूद करावंसं वाटतं, की बदलत्या काळात डॉक्टरांना येणाऱ्या कटु अनुभवामुळे न मागता वैद्यकीय सेवा देण्याची जोखीम डॉक्टर स्वीकारणार नाहीत. उलट लवकरात लवकर त्याला सरकारी दवाखान्यात घेऊन जा असा सल्ला देणं ते पसंत करतील.

या सुमारास माझ्या वडिलांना रोज नवनव्या पोटाच्या तक्रारींचा त्रास होत होता. याच डॉक्टरांचे औषध सुरू होते, पण म्हणण्यासारखा गुण येत नव्हता. एक दिवस त्यांनी माझ्या वडिलांना विश्वासात घेऊन सांगितलं, 'हे पहा अण्णा, मला हे तुमचं दुखणं फार साधं वाटत नाही. नुसत्या औषधानं बरं होण्याची शक्यता फार कमी आहे. एखादी

शस्त्रक्रिया करावी लागेल असे वाटते. तेव्हा तुम्ही अगदी लवकरात लवकर मिरजेच्या मिशन हॉस्पिटलला जाऊन दाखवावे.' असे त्यांनी माझ्या वडिलांना स्पष्ट सांगितले.

आठ दिवस होऊन गेले तरी माझे वडील मिरजेला जाण्याचं नाव काढेनात. एक दिवस डॉक्टरनी माझ्या वडिलांना हुकूमच सोडला, 'अण्णा, ५ तारखेला म्हणजे आणि दोन दिवसांनी आपण दोघं मिरजेला जाणार आहोत.' ठरल्याप्रमाणं दोघे मिरजेला गेले आणि परत आले, ते शस्त्रक्रियेची तारीख ठरवूनच. वडिलांची शस्त्रक्रिया झाली. जिवावरच्या दुखण्यातून ते पार पडले. त्यानंतर २५ वर्षं वडिलांचं छत्र आम्हाला लाभलं. आजही डॉक्टर आपल्या रुग्णासाठी तज्ज्ञ डॉक्टरला पत्र देतात, मदत करू पाहतात, पण का कोण जाणे, आजच्या या बदलत्या जगात यामागेही कांही पैशाचा खेळ नसेल ना अशी वेडी शंका मनात येते.

३० जानेवारी १९४८ नंतर अशा काही घटना एकापाठोपाठ एक घडत गेल्या की गावातील संपूर्ण सामाजिक जीवन ढवळून निघालं. गावातलं आपलं घर किंवा मळा याची कोणतीही खूण पाठीमागे न ठेवता आम्ही गाव सोडलं. आमच्या पाठोपाठ डॉक्टर कुटुंबियांनीही गाव सोडलं. पुन्हा त्यांची भेट झाली नाही. तरुण वयात डॉक्टरांच्या ठायी वैद्यकीय व्यवसायाविषयीची निष्ठा, आत्मविश्वास आणि हा व्यवसाय म्हणजे सेवा आहे ही त्यांची भावना आजही आठवली तरी मन कृतज्ञतेने भरून येतं आणि नकळत डोळ्याच्या पापण्या ओलावतात.

१९५० साली आम्ही कोल्हापुरात आलो. आमच्या घरापासून २००-२५० पावलावर विरूद्ध दिशांना दोन दवाखाने होते. पूर्वी हे दवाखाने स्वतंत्र, खूप मोठ्या इमारतीत असण्याऐवजी ज्या इमारतीत एखादं-दुसरं कुटुंब राहताहेत अशाच इमारतीत तळमजला किंवा वरच्या मजल्यावर असायचे. त्यामुळे दवाखान्यात जाताना फाशी भीती वाटायची नाही. तसेच त्यावेळी पेशंट/रुग्ण आला की लगेच इजेक्शन देणे, सलाईन लावून झोपवून ठेवणे अशाही गोष्टी केल्या जात नसत. आजकाल विशिष्ट वर्गातले, विशिष्ट विचारांचे लोक डॉक्टरकडे जाऊन मला सलाईन किंवा इंजेक्शन द्या असा जवळजवळ हुकूमच सोडतात. त्यावेळी हे दवाखाने जेमतेम दोन खोल्यांचे असायचे. दारातून आल्यावर बाहेरच्या खोलीत रूग्णांना बसवण्यासाठी एक-दोन लाकडी खुर्च्या आणि बाक असायचे. बहुतेक दाराच्या समोरून काचेतून दिसणाऱ्या बाटल्या आणि या तावदानाखाली एक खिडकी. या खिडकीतून सहज दिसणारा माणूस म्हणजे कंपाऊंडर. रिसेप्शनिस्ट हा प्रकार नसायचाच. दुसरी खोली डॉक्टरांची. त्या खोलीत त्यांचं टेबल खुर्ची, समोर रुग्णासाठी दोन खुर्च्या, एका बाजूला पडद्यामागे रूग्ण तपासण्याचं टेबल असायचं. रुग्ण लहान-मोठा कोणीही असला तरी डोळ्यांची खालची पापणी किंचीत खाली ओढून तपासणीला सुरुवात व्हायची. त्यानंतर जीभ, घसा, छाती आणि पोटाचीही अनेक ठिकाणी हाताने दाब देवून तपासणी पार पडायची. पातळ औषध आणि क्वचित प्रसंगी पावडरच्या पुड्या मिळायच्या. पातळ औषध असलेल्या बाटलीवर औषधाचा प्रत्येक डोस किंवा मात्रा दाखविणारी नक्षीदार पट्टी चिकटवलेली


सोने-चांदी मौल्यवान खरेदी !

**गोखले ब्रदर्स**

सराफी दुकान

बुधवार, दि. १५ : पुष्य नक्षत्र

आपलं दुकान

महाद्वार रोडवर

0231-2546585

असायची.

वैद्यकीय शास्त्राची इतक्या झपाट्याने प्रगती होत आहे. नव्याने वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश करणारी प्रत्येक व्यक्ती स्पेशलायझेशन करते. यामुळे जनरल प्रॅक्टीस करत अनेक कुटुंबांना आधारभूत वाटणारी फॅमिली डॉक्टर ही संकल्पना आज आढळत नाही. फॅमिली डॉक्टर किंवा फॅमिली फिजिशियनमुळे त्या कुटुंबाचं जगणं निश्चितच सुकर होतं. फॅमिली डॉक्टर त्या कुटुंबाचा एक भाग होऊन राहत. तो केवळ वैद्यकीय सल्लगार असत नाही, तर त्या कुटुंबाचा हितचिंतक, मार्गदर्शक, मित्र असतो. मुलांचं शिक्षण, व्यवसाय, विवाह इ. बाबतही अनेक कुटुंबात फॅमिली डॉक्टरचे मत विचारात घेतले जाई. घरातली लहान मुलं, तरुण, प्रौढ, आजी-आजोबा इ. साऱ्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याचा मंत्र जाणणारी व्यक्ती म्हणजे फॅमिली डॉक्टर, लहान मुलांचा ताप, पडसं, खोकला इ. दूर करणं ते आजी-आजोबांचा रक्तदाब, मधुमेह इ. नियंत्रणात ठेवणे या साऱ्यासाठी एकच व्यक्ती असते, ती म्हणजे फॅमिली डॉक्टर.

संबंधित कुटुंबाची आर्थिक स्थिती, राहणीमान, आहार, विहार इ. बाबींशी त्यांचे फॅमिली डॉक्टर परिचित असल्याने औषधोपचार देताना या गोष्टींचाही विचार केला जाई. व्यक्तिगत परिचयामुळे आजारासंबंधी बोलताना निश्चितच एक मोकळेपणा असे. शिवाय फॅमिली डॉक्टरांच्या सल्ल्यावर पूर्ण विश्वास असल्याने आंतून निर्माण होणाऱ्या मानसिक बळावर आजारांतून लवकर बाहेर पडणे निश्चित सुलभ होत असे, हे विधान अतिशयोक्तीचे होणार नाही असेच म्हणावेसे वाटते. जवळपास नेहमीच आपल्या घरापासून अगदी जवळ असणारे डॉक्टरच फॅमिली डॉक्टर म्हणून निवडले जात. ज्यामुळे त्यांच्याकडे जाणे त्रासदायक वाटत नसे. प्रसंगी आजी-आजोबांचं औषध आणायला किंवा जखमेचं ड्रेसिंग करून घेण्यास आई-वडिलांच्यावर अवलंबून न राहता आठ-दहा वर्षांची मुलं आपली आपण डॉक्टर काकांकडे जाऊन येत. नोकरी करणाऱ्या व्यक्तीला आजारपणाचे प्रमाणपत्र सादर करणे हे नक्कीच अवघड जात नव्हते. फॅमिली डॉक्टरमुळे कमी खर्चात दुखण्याचे प्रारंभिक निदान होऊन गरज पडल्यास त्यांच्याच सांगण्यावरून तज्ञ डॉक्टरकडे जाऊन पुढील उपचार घेतले जात असत.

महत्त्वाचं म्हणजे फॅमिली डॉक्टर प्रसंगी घरी येऊन रुग्णाची सखोल वैद्यकीय तपासणी करून जात असत. आजकाल ही गोष्ट दुर्मीळ झाली आहे, पण आजही जुन्या पिढीतील एम.बी.बी.एस. डॉक्टर फॅमिली डॉक्टर म्हणून सेवा देतात. पुण्यात माझी बहीण राहते. वय वर्षे ९०. रक्तदाब, मधुमेह असलं कोणतंही दुखणं नाही. घरातल्या घरात हिंडते, फिरते. तिचे फॅमिली डॉक्टर वय ८३. फोनवरून सल्ला देतात. प्रसंगी तिचा नातू त्यांच्या दवाखान्यात जाऊन त्यांना गाडीने घरी घेऊन येतो. आमच्या येथील सोसायटीच्या सर्व घरांचे फॅमिली डॉक्टर त्यांच्या घरीच असलेल्या दावाखान्यात असायचे. तो आम्हा सर्वांना फार मोठा आधार होता. नियतीने तो आधार आमच्यापासून दूर नेला. तसं त्यांचं वय जेमतेम ७० होतं, मात्र नियतीपुढं कुणाचं काही चालत नाही!

पूर्वी रुग्णालयात I treat, He cures दर्शनी भागात अशी पाटी दिसायची. केवढा अर्थ या चार शब्दांत! माझ्या रुग्णाला बरं वाटावं म्हणून मी प्रयत्नांची पराकाष्ठा करेन, पण त्याला पूर्ण बरं करणं हे त्या सर्वशक्तीमान परमेश्वर किंवा नियतीच्या हाती असते. ''आले देवाजीच्या मना, तेथे कोणाचे चालेना'' हे प्रत्येकाला माहित असते. आज काल रुग्ण दगावला तर डॉक्टरना कटू प्रसंगांना सामोरं जावं लागतं. त्यामुळे अनेक शाखांचे तज्ञ डॉक्टर्स एकत्र येऊन स्वतंत्र व्यवस्थापनाच्या सहाय्याने वैद्यकीय व्यवसाय करतात. एकेका शाखेच्या अंतर्गत चार-पाच तज्ञ डॉक्टर्स असतात. एकाच छताखाली सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा देणाऱ्या संयुक्त, सामुदायिक किंवा Corporate Hospitals आज

**पान २२ वर पहा...**

# मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा !

**(लेखांक सहा)**

आज सकाळी लवकर जाग आली. रात्रीची झोप एसी मध्ये झाली असल्यामुळे छान झोप झाली व सकाळी अगदी ताजेतवाने वाटत होते. सर्व आन्हिक उरकल्यावर सायकलवर सामानाची बांधाबांध केली. पोलीस स्टेशनमध्ये असलेल्या पोलिसांचा निरोप घेतला व पुढे मार्गस्थ झालो.

ऋषिकेश पासून पुढे पहाडामधील रस्ता असल्यामुळे चढ उतार होते याची जाणीव लगेचच झाली. खडा चढ सुरू झाला तरीही नव्या दमाने मी सायकल चालवत राहिलो, अंदाजे पंधरा किलोमीटर अंतर पार झाले तेव्हा सकाळचे आठ वाजले होते.

ह्या प्रवासात बऱ्याच ठिकाणी भूस्खलन झाल्यामुळे पहाडातील दगड व मातीचे ढीग रस्त्यावर आले होते. त्यातून वाट काढत पुढे जाताना माझी चांगलीच दमछाक झाली होती, तरीही निर्धाराने पाय फिरवत होतो.

पुढे वाटेत एका पोलीस चौकीवर पोलिसांनी मला धमकी वजा विनंती केली की, पुढचा रस्ता दरड कोसळल्याने बंद आहे. चालू होण्यास किती वेळ लागेल सांगता येत नाही. त्यामुळे तुम्ही सायकल घेऊन जाऊ नये, मी पण बरं म्हणून पुढे निघालो.

सकाळचे नऊ वाजले होते मनात विचारचक्र सुरू झाले. कारण पहाडाचा मोठा भाग रस्त्यावर आल्यामुळे रस्ता बंद झाला होता. मी नरेंद्रनगरमध्ये थांबून नाष्टा केला. तिथल्या हॉटेल मालकाने सांगितले की, सध्या रस्त्यांची अवस्था बिकट आहे व मध्येच अडकलात तर मदत लवकर मिळणार नाही. त्यामुळे तुम्ही सायकल इथेच ठेवून पुढील प्रवास सार्वजनिक वाहनाने करावा, माझ्या पोटात भुकेचा खड्डा व मनात भीतीचा गोळा अशी विचित्र अवस्था झाली होती. बराच वेळ विचार केल्यानंतर सायकल प्रवास थांबवून पुढे निघण्याचे ठरवले. सामानाची वर्गवारी केली. मोजकेच पण गरजेचे सामान पाठीवर व हातात भगवा ध्वज घेतला सायकल व बाकीचे सामान हॉटेल मालक श्री. जयपाल नेगी यांच्या गोडाऊनमध्ये ठेवले व पुढील प्रवासाला निघालो. आता पुढचा प्रवास मिळेल त्या साधनाने होणार होता पण गजानन महाराज बरोबर असल्यामुळे त्यांनी माझ्यासाठी वेगळीच योजना करून ठेवली होती. ही घडामोड घरी कळवावी म्हणून मी घरी फोन केला तेव्हा आईने सांगितले की कोल्हापूरचे श्री. प्रकाश यादव, जे आठ दिवसांपूर्वी चारधाम यात्रेकरता यात्रेकरूंना घेऊन जाणार होते ते, पावसामुळे तेव्हा न जाता आत्ता याच भागामध्ये आहेत. याची तिने मला कल्पना दिली व त्यांचा फोन नंबर मला दिला. मी त्यांना फोन केला तेव्हा ते यमुनोत्री येथून उत्तरकाशी येथे आले होते. मी तेथून सार्वजनिक वाहनाने निघालो. वाटेत बऱ्याच ठिकाणी दरड कोसळली होती. संध्याकाळी उत्तरकाशी येथे पोहचलो. श्री. प्रकाश यादव यांना भेटून तिथे काशी विश्वेश्वराचे दर्शन घेऊन त्यांच्या गाडीतून त्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी आलो.

– **ओंकार गाडगीळ,** मोबा. ९८२२८७६९२२

**दुःखद निधन**



कोल्हापूर चित्पावन संघाच्या ज्येष्ठ सभासद व हितचिंतक लीना मधुसूदन गद्रे यांचे दि. १४ जून २०२६ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. कोल्हापूर चित्पावन संघ आणि नवस्नेह परिवार यांच्यातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

# 'भारतरत्न' लता मंगेशकर



लता मंगेशकरांचा जन्म मध्य प्रदेश राज्यातील इंदूर शहरात २८ सप्टेंबर १९२९ रोजी झाला. त्यांचे वडील पंडित दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक तसेच नाट्यकलावंत होते. लता ही आपल्या आई-वडिलांचे सर्वात ज्येष्ठ अपत्य. आशा भोसले, उषा मंगेशकर, मीना खडीकर,आणि हृदयनाथ ही त्यांची लहान भावंडे आहेत. त्या भारतीय गायिका आणि संगीतकार होत्या.

त्यांना पहिले संगीताचे धडे आपल्या वडलांकडूनच मिळाले. वयाच्या पाचव्या वर्षी त्यांनी वडलांच्या संगीत नाटकांमध्ये बाल-कलाकार म्हणून कामाची सुरुवात केली. संगीत क्षेत्रातील अलौकिक स्वरांनी त्यांनी जगाला मोहिनी घातली. त्यांच्या आवाजाने अनेक गाणी अजरामर झाली. त्यांचे बालपण सांगलीत गेले. नाटककार, गायक, संगीतकार दीनानाथ मंगेशकर यांच्या घरी लतादीदींचा जन्म झाला. मंगेशकर कुटुंबिय मूळचे गोव्याचे. त्यांचे मूळ आडनाव नवाथे. सांगली येथे दीनानाथ मंगेशकर यांना मास्टर ही पदवी प्राप्त झाली. लतादिदी सांगलीतील ११ नंबरच्या सरकारी शाळेत आपल्या लहान भावंडांसह शाळेत शिकायला जात असत. एका शिक्षकांनी छोट्या लताला खूप रागावले. तेव्हापासून लतादिदींचे शाळेत जाणे बंद झाले. तेव्हा एक शिक्षक घरी येऊन त्यांना शिकवत असे. नंतर काही काळाने मंगेशकर कुटुंबाने सांगली शहर सोडले.

इ.स. १९४२ मध्ये लता मंगेशकर अवघ्या १३ वर्षांच्या होत्या, तेव्हा वडील हृदयविकाराने निवर्तले. त्यावेळी मास्टर विनायक ह्यांनी लताच्या परिवाराची काळजी घेतली. त्यांनी लताबाईंना गायिका आणि अभिनेत्री म्हणून कामाचा प्रारंभ करून दिला. मास्टर विनायकांनी लताबाईंना नवयुगच्या **पहिली मंगळागौर** (इ.स. १९४२) ह्या मराठी चित्रपटात एक छोटी भूमिका दिली. ह्या चित्रपटात त्यांनी गीत गायले. इ.स. १९४५ साली लता मंगेशकर मुंबईला आल्या. त्या उस्ताद अमानत अली खाँ (भेंडीबाजारवाले) ह्यांच्याकडून हिंदुस्तानी शास्त्रोक्त संगीत शिकू लागल्या. त्यांनी **आपकी सेवामें** (इ.स. १९४६) ह्या हिंदी चित्रपटासाठी **पा लागूं कर जोरी** हे गाणे गायले. लता आणि आशा यांनी मास्टर विनायकांच्या पहिल्या हिंदी चित्रपटात नूरजहाँ सोबत छोट्या भूमिका केल्या. मास्टर विनायकांच्या दुसऱ्या हिंदी चित्रपटाच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळेस लता मंगेशकर यांची ओळख संगीतकार वसंत देसाई यांच्याशी झाली.

इ.स. १९४७ मध्ये उस्ताद अमानत अली खाँ भेंडीबाजारवाले यांनी नवनिर्मित पाकिस्तानला देशांतर केले, तेव्हा लतादीदी अमानत खाँ (देवासवाले) यांच्याकडे शास्त्रोक्त संगीत शिकायला लागल्या. उस्ताद बडे गुलाम अली खान साहेबांचे शिष्य पंडित तुलसीदास शर्मांकडूनही लताबाईंना तालीम मिळाली. सुरुवातीला लता मंगेशकर आपल्या गाण्यात तेव्हाच्या लोकप्रिय असलेल्या नूरजहाँचे अनुकरण करीत असत, पण नंतर स्वतःच्या गाण्याची एक आगळी शैली त्यांनी बनवली. १९५० च्या दशकात लताने ज्या संगीत दिग्दर्शकांनी

स्वरबद्ध केलेली गाणी गायिली असे नामांकित संगीतकार अनिल विश्वास, शंकर-जयकिशन, नौशाद, सचिन देव बर्मन, सी. रामचंद्र, हेमंतकुमार, सलिल चौधरी, खय्याम, रवी, सज्जाद हुसेन, रोशन, मदन मोहन, कल्याणजी आनंदजी, मास्टर कृष्णराव, वसंत देसाई, सुधीर फडके, हंसराज बहल आणि उषा खन्ना हे होते

संगीतकार नौशाद यांच्या दिग्दर्शनाखाली शास्त्रोक्त संगीतावर आधारित काही गाणी त्यांनी गायिली. सुप्रसिद्ध संगीतकार जोडी शंकर-जयकिशन यांनी तर आपल्या जवळजवळ सर्व चित्रपटांच्या (विशेषतः राज कपूरनिर्मित) गाण्यांच्या गायिका म्हणून लताचीच निवड केली. सचिन देव बर्मन आपल्या बहुतेक चित्रपटगीतांच्या प्रमुख गायिका म्हणून लताची निवड करीत.

२७ जून, इ.स. १९६३ ला भारत-चीन युद्धानंतर एका कार्यक्रमात लता मंगेशकरनी कवी प्रदीप यांनी लिहिलेले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केलेले **'ऐ मेरे वतन के लोगों'** हे देशभक्तीपर गीत भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत गायले.

इ. स. १९६० च्या दशकात लता मंगेशकरनी मदनमोहन ह्या आपल्या आवडत्या संगीतकाराची अनेक गाणी म्हटली. लता मंगेशकरनी मराठी सिनेमांसाठी अनेकानेक गाणी गायिली. त्यांनी ज्या नामांकित संगीतकारांबरोबर काम केले, त्यांमध्ये हृदयनाथ मंगेशकर, वसंत प्रभू, श्रीनिवास खळे आणि सुधीर फडकेंचा विशेष उल्लेख करायला हवा. लता मंगेशकरनी स्वतः **'आनंदघन'** ह्या टोपणनावाने मराठी गाणी स्वरबद्ध करून गायिलेली आहेत. लताने संगीतकार सलिल चौधरी आणि हेमंतकुमारांची बंगाली भाषेतली गाणीही म्हटली आहेत. लता मंगेशकरनी मुकेश, मन्ना डे, महेंद्र कपूर, मोहम्मद रफी आणि किशोर कुमार यांसारख्या त्या काळातील सर्व प्रसिद्ध गायकांबरोबर युगलगीते गायिली होती. उस्ताद अमीरखाँ आणि उस्ताद बडे गुलामअली हे त्यांचे आवडते गायक होते १९७३ मध्ये आर.डी. बर्मन यांनी संगीतबद्ध केलेल्या आणि गुलजार यांनी लिहिलेल्या 'परिचय' चित्रपटातील **'बीती ना बिताई'** या गाण्यासाठी लतादिदीना **'सर्वोत्कृष्ट महिला पार्श्वगायिकेचा - राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार'** मिळाला. १९७५ मध्ये, कल्याणजी आनंदजी यांनी संगीतबद्ध केलेल्या कोरा कागज चित्रपटातील **'रुठे रुठे पिया'** या गाण्यासाठी त्यांना पुन्हा **'राष्ट्रीय पुरस्कार'** मिळाला.

१९७० पासून, लता मंगेशकर यांनी भारत आणि परदेशात अनेक मैफिली आयोजित केल्या. परदेशात त्यांची पहिली मैफल १९७४ मध्ये रॉयल अल्बर्ट हॉल, लंडन येथे झाली. हा मान मिळालेली तोपर्यंत लता मंगेशकर ही पहिली भारतीय गायिका होती. त्यांनी आसामी भाषेतही अनेक गाणी गायली आणि आसामी संगीतकार भूपेन हजारिका यांच्याशी खूप चांगले संबंध निर्माण केले. १९९० मध्ये मंगेशकर यांनी हिंदी चित्रपटांसाठी स्वतःचे प्रोडक्शन हाऊस सुरू केले, ज्याने गुलजार-दिग्दर्शित 'लेकिन' चित्रपटाची निर्मिती केली.

१९५५ मध्ये त्यांनी 'राम राम पावणं' या मराठी चित्रपटासाठी पहिल्यांदा संगीत दिले. नंतर १९६० च्या दशकात त्यांनी 'आनंदघन' या टोपण नावाने मराठी चित्रपटांसाठी संगीत दिले. राम राम पावणं, मराठा तितुका मेळवावा, मोहित्यांची मंजुळा, साधी माणसे आणि तांबडी माती या चित्रपटांसाठी लता मंगेशकर यांना **'महाराष्ट्र राज्य सरकारचा - सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शक पुरस्कार'** मिळाला. याच चित्रपटातील **'ऐरणीच्या देवा तुला'** या गाण्याला **'सर्वोत्कृष्ट गाण्याचा पुरस्कार'** मिळाला.

लता मंगेशकर यांनी 'वादळ' या मराठी चित्रपटासह झांझर, कांचन गंगा व लेकीन या हिंदी चित्रपटांची निर्मिती केली आहे. **'साधी माणसं'** साठी **'आनंदघन'** नावाने **'सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक'** व **'संगीत दिग्दर्शक'**, जैत रे जैतसाठी **'सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक - महाराष्ट्र भूषण पुरस्कार'**, **'महाराष्ट्र रत्न - महाराष्ट्र राज्य पुरस्कार'** प्राप्त झाले. परिचय, कोरा

कागज, आणि लेकीन चित्रपटातील गाण्यांसाठी **'सर्वोत्कृष्ट महिला पार्श्वगायिकेचा – राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार'** मिळाले.

लता मंगेशकर यांनी १९५९ ते १९६७ पर्यंत सर्वोत्कृष्ट महिला पार्श्वगायिका पुरस्काराची मक्तेदारी केली. मधुमती, बीस साल बाद, खंडन, जीने की राह, हम आपके है कौन साठी **'फिल्मफेअर विशेष पुरस्कार'** प्राप्त झाले. १९७० मध्ये, लतादीदींनी नवीन प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी फिल्मफेअर पुरस्कार सोडण्याची घोषणा केली.

लता मंगेशकर यांना **भारत सरकारचे– पद्मभूषण, दादासाहेब फाळके, पद्मविभूषण** २००८ साली भारताच्या स्वातंत्र्याच्या ६० व्या वर्धापन दिनानिमित्त **'वन टाइम अवॉर्ड फॉर लाइफटाइम अचिव्हमेंट सन्मान'** ,१९९९ मध्ये मंगेशकर यांना राज्यसभेचे सदस्य म्हणून नामांकन देण्यात आले. त्याच वर्षी, त्यांनी पुण्यात मास्टर दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलची स्थापना केली.

लता मंगेशकर यांना २००१ साली **'भारतरत्न पुरस्कार'** प्राप्त झाला. भारतीय संगीत क्षेत्रामध्ये सात दशकांच्या कारकिर्दीतील योगदानासाठी त्यांना भारतीय **'गानकोकिळा' (Nightingale of India)** आणि **'क्वीन ऑफ मेलडी'** सारख्या सन्माननीय पदव्या मिळाल्या.

लतादीदींनी तब्बल ३६ पेक्षा जास्त भारतीय भाषांमध्ये आणि काही परदेशी भाषांमध्ये गाणी ध्वनिमुद्रित केली होती. त्या प्रामुख्याने हिंदी आणि मराठीत गात होत्या. त्यांना त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळाले. १९८७ मध्ये त्यांना **'भारत सरकारने – दादासाहेब फाळके पुरस्कार'** प्रदान केला.

फ्रान्स सरकारने त्यांना **फ्रान्सचा 'सर्वोच्च नागरी पुरस्कार – द लीजन ऑफ ऑनर'**ने सन्मानित केले. त्यांना तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, १५ बंगाल फिल्म जर्नालिस्ट असोसिएशन पुरस्कार, चार फिल्मफेअर सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका पुरस्कार, दोन फिल्मफेअर विशेष पुरस्कार, फिल्मफेअर जीवनगौरव पुरस्कार आणि बरेच इतर पुरस्कार मिळाले.

लता मंगेशकर यांना कोविड–१९ ची लागण झाल्यामुळे त्यांचे अनेक अवयव निकामी झाले. २८ दिवस उपचार घेतल्यानंतर मुंबईतील ब्रीच कँडी हॉस्पिटल येथे ६ फेब्रुवारी २०२२ रोजी त्यांचे निधन झाले.

**– विकास मेहेंदळे,** मोबा. ९४२०१५५११४

---

# बदलती वैद्यकीय सेवा

**पान ७ वरून पुढे...**

प्रामुख्याने निर्माण होत आहेत, ही निश्चितच काळाची गरज आहे. उत्तमोत्तम अद्यावत साधनांमुळे आज अनेक शस्त्रक्रिया विना टाक्यांच्या लेसरद्वारे केल्या जातात. मोतीबिंदू शस्त्रक्रिया पार पाडून रुग्ण दोन तासात दवाखान्यातून घरी येऊ शकतो.

पेशंट दाखल झाला की अत्यावश्यक वैद्यकीय चाचण्या केल्या जातात – यात आढळलेल्या दोषानुसार उत्तमोत्तम औषधे जी त्याच हॉस्पिटलच्या दुकानात मिळतात – दिली जातात. पूर्ण बरं नाही वाटलं तर पुन्हा एखादी चाचणी आणि औषधोपचार दिले जातात. पैशाचं मीटर चालू राहतं. रुग्ण खडखडीत बरा होऊन घरी जातो. प्रगत वैद्यकीय साधने आणि औषधे यामुळे सरासरी आयुष्यमान खूप वाढले आहे. पण डॉक्टर आणि रुग्ण यांच्या नात्यातला पूर्वीचा ओलावा कमी झाला आहे. या नात्यामध्ये एक प्रकारचा अलिप्तपणा येऊन काहीसे व्यावसायिक स्वरूप येऊ पाहते आहे अशी शंका मनात डोकावते. रुग्ण आणि डॉक्टर यामधील जिव्हाळ्याचा धागा काहीसा कमकुवत किंवा क्षीण होतो आहे असे म्हणावेसे वाटते. अर्थात यालाही सुखद धक्का देणारे अपवाद आहेतच.

**– कमल हर्डीकर,**
मोबा. ९६८९३६९९२६, ९४२०४५८४२५

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर

# शैक्षणिक पारितोषिक योजना २०२६-२०२७

(फक्त सभासदांचे मुलामुलींसाठीच)

## शैक्षणिक अर्हता व बक्षिसे

१. **प्राथमिक शाळा स्तर –** १ ली ते ४ थी परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे.

२. **माध्यमिक –** ५ वी ते ९ वी परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे.

३. **स्कॉलरशिप परीक्षा –** ४ थी व ७ वी परीक्षेत यश मिळविणाऱ्यांना बक्षिसे.

४. **हायस्कूल स्तर/एस.एस.सी. –** इयत्ता १० वी स्तरावर प्रथम येणारी मुलगी, प्रथम येणारा मुलगा, तसेच इंग्रजी, गणित, संस्कृत व मराठी या विषयात सर्वोत्तम गुण प्राप्तीसाठी बक्षिसे.

५. गणित प्रज्ञा परीक्षा, MTS, NTS परीक्षा इ.क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या पाल्यांना बक्षिसे.

६. **कनिष्ठ महाविद्यालय/एच.एस.सी. –** इ. १२ वी (तीनही शाखा) मुलांत प्रथम, मुलीत प्रथम, तसेच इंग्रजी, गणित आणि संस्कृत विषयात सर्वोत्तम गुण प्राप्तीसाठी बक्षिसे.

७. **पदवी स्तर –** कला, शास्त्र आणि वाणिज्य या तीन विद्याशाखांत तसेच बी.बी.ए., बी.सी.ए. गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्यांना बक्षिसे.

८. **पदव्युत्तर स्तर –** कला, शास्त्र, वाणिज्य, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शाखांत तसेच एम.सी.ए. मध्ये प्रथम येणाऱ्या पाल्यांसाठी बक्षिसे.

९. **विशेष बक्षीस योजना –** एमबीबीएस, एम.टेक., सीए, आयसीडब्ल्यूए. तसेच ललित कला, संगीत कला, वक्तृत्व कला, क्रीडा, चित्रकला इत्यादी क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या पाल्यांना बक्षिसे.

१०. **पत्रकारिता शिक्षणासाठी प्रोत्साहनपर बक्षीस**

मागील वर्षापासून बक्षिसामध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे याची कृपया नोंद घ्यावी.

११. **इ. १ ली ते ९ वी –** प्रत्येकी तीन क्रमांक. **१२. इ. ४ थी व इ. ७ वी –** स्कॉलरशिप – प्रत्येकी तीन क्रमांक.

१३. **इ. १० वी –** १. विद्यार्थ्यांत प्रथम व विद्यार्थिनीत प्रथम, २. विषयवार बक्षिसे (प्रथम व द्वितीय)
अ. इंग्रजी, ब. गणित, क.संस्कृत, ड.मराठी, इ. विज्ञान

१४. **इ. १२ वी –** १. विद्यार्थ्यांत प्रथम व विद्यार्थिनीत प्रथम (शाखानिहाय),
२. विषयवार (शाखानिहाय – प्रथम व द्वितीय) –
अ. इंग्रजी, ब.गणित, क.संस्कृत, ड. विज्ञान,

१५. **शाखानिहाय पदवीधर –** आर्टस्, कॉमर्स, सायन्स, इंजिनिअरींग, मेडिकल, एल्.एल्.बी.

१६. **पदव्युतर –** एम्.ई. एम्.टेक्., सर्जरी, एल्.एल्.एम्., एम्.ए. एम्.कॉम, एम्.एस्सी., एम.बी.ए., सी.ए.,UPSC, MPSC

१७. **प्रवेश परीक्षा –** सी.ए.(CPT) एन.डी.ए.(Foundation) आय.आय.टी. (JEE) आय.सी. डब्ल्यू, व सी.एस्.(Foundation)

१८. **सभासदांकरिता –** वक्तृत्व, संगीत, पाककृती, नृत्य, गायन, वादन किंवा सर्व क्षेत्रातील कलाकौशल्यासाठी विशेष बक्षिसे

**संस्थेकडील विहित नमुन्यातील अर्ज पूर्ण भरून आवश्यक ते कागदपत्रे जोडून कोल्हापूर चित्पावन संघ कार्यालयात जमा करावेत. संघाची कार्यकारिणी तसेच शैक्षणिक समिती पारितोषिकांबाबत योग्य निर्णय घेईल. अर्जदार (पालक) संघाचे सभासद असणे आवश्यक आहे.**

**।। अवीट गोडीचे श्रीरामायण ।।**

# उगा कां काळिज माझें उले

उगा कां काळिज माझें उले
उगा कां काळिज माझें उले ?
पाहुनी वेलीवरचीं फुलें

कधी नव्हे तें मळलें अंतर
कधीं न शिवला सवतीमत्सर
आज कां लतिकावैभव सले ?

काय मना हें भलतें धाडस ?
तुला न आवडे हरिणी–पाडस
पापणी वृथा भिजे कां जलें ?

गोवत्सांतिल पाहुन भावां
काय वाटतो तुजसी हेवा ?
चिडे कां मौन तरी आंतलें ?

कुणी पक्षिणी पिलां भरविते
दृश्य तुला तें व्याकुळ करितें
काय हें विपरित रे जाहलें ?

स्वतःस्वतःशीं कशास चोरी ?
वात्सल्याविण अपूर्ण नारी
कळालें सार्थक जन्मांतले

मूर्त जन्मते पाषाणांतुन
कौसल्या का हीन शिळेहुन ?
विचारें मस्तक या व्यापिलें

गगन अम्हांहुनि वृद्ध नाहि का ?
त्यांत जन्मती किती तारका !
अकारण जीवन हें वाटलें

गीत रामायणातील हे तिसरे गीत महाराणी कौसल्येच्या तोंडी आहे. पोटी पुत्र नसल्याचे दुःख ती या गीतात सांगते आहे. सृष्टीत सर्वत्र सृजन होत आहे. फक्त माझ्याच आयुष्यात हा वांझपणा का? वेलीवर उमलणारी नाजूक कोवळी फुलं पाहून तिचं काळीज करपून जात आहे. या गीतात उपमा अर्थालंकार खूपच प्रभावीपणे ग दी मा मांडतात. कौसल्या स्वतःची तुलना निसर्गातील अनेक घटकांशी करते. हरिणीचे पाडस पाहून तिचे डोळे ओलावतात. गाय, वासराचे प्रेम पाहून तिला हेवा वाटतो. पक्षिणी पिलाला चारा भरवताना पाहून ती व्याकूळ होते. आयुष्यात वात्सल्य नसेल तर आयुष्य अपूर्ण आहे असं तिला वाटतं. नुसते सजीव नाहीत तर निर्जीव अशा पाषाणातूनही मूर्ती जन्म घेते, मग मी पाषाणाहून हीन आहे का? असे प्रश्न तिच्या मनात येतात. शेवटी ती म्हणते की हे आकाश तर माझ्याहून कितीतरी वृद्ध आहे, त्यातही तारका जन्म घेतात. तिला आपला जन्म व्यर्थ वाटू लागतो. यावर काहीच उपाय नाही का? असा विचार तिच्या मनात येतो.

**– सुधीर दाजी जोशी,**
९८२२२९८७२६

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलींची माहिती - जुलै २०२६)

| अ. क्र. | वधूचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्रद्धा<br>--- | देशस्थ ऋ. | २८/६/२००१<br>५.४ | भारद्वाज, कन्या हस्त, आद्य | B.Sc. M.C.A. (Engg) | खाजगी नोकरी | मा.प्रा.<br>२०,०००/- | श्रीपाद सदाशिव संगमनेरकर<br>संगमनेर, जि. अहमदनगर<br>९८२२७३१८२१ |
| २. | मानसी<br>--- | यजुर्वेदी | ४/२/९९<br>५.२ | कौशिक, सिंह, उ.फाल्गुनी, आद्य | B.E. E & TC | पुणे येथे नोकरी | मा.प्रा.<br>--- | यशवंत रामचंद्र कुलकर्णी<br>नाशिक<br>८४२१६०७१६५ |
| ३. | अमृता<br>--- | यजुर्वेदी | ३/११/९०<br>५.७ | कृष्णात्रेय, मेष, भरणी, मध्य | M.Arch. | स्वत:चा व्यवसाय | मा.प्रा.<br>४०,०००/- | श्रीकांत दे. उपळेकर<br>नाशिक<br>९४२०७१७७०१ |
| ४. | वैष्णवी<br>--- | देशस्थ ऋ. | २६/१२/९५<br>५.५ | कामाक्ष, कुंभ, धनिष्ठा, पहिले आद्य | M.Sc. Micro-Biology | नोकरी | मा.प्रा.<br>१७,०००/- | सुनिल विनायक कुलकर्णी<br>नाशिक.<br>९६२३०४०५७० |
| ५. | नेहा<br>--- | देशस्थ ऋ. | ४/७/२०००<br>५.६ | शांडिल्य, कर्क आश्लेषा, चौथे अंत्य | B.Com. B.Ed. | नोकरी शिक्षिका | वा.प्रा.<br>२ लाख | गोविंदराव इनामदार<br>चिंचवड, पुणे.<br>९७६६३१८१६६ |
| ६. | स्मिता<br>नाममात्र घटस्फोटीत | यजुर्वेदी | ८/१२/९२<br>५.५ | चंद्रात्रे, वृषभ कृतिका, अंत्य | B.Sc. Dip. in Graphic Design | नोकरी | मा.प्रा.<br>४०,०००/- | प्रेमनाथ भानुदास चंद्रात्रे<br>इंदिरानगर, नाशिक<br>९८९०९१७११२ |
| ७. | श्रेया<br>--- | यजुर्वेदी | १६/६/९६<br>५.६ | गार्ग्य, मिथुन, मृग, मध्य | B.Com. Semi Qualified CA | नोकरी | वा.प्रा.<br>६ लाख | संजय हरिश्चंद्र चंद्रात्रे<br>ठाणे<br>९८९२३८५९६५ |
| ८. | भाग्यश्री<br>--- | यजुर्वेदी | १८/६/९२<br>५.३ | शांडिल्य, मकर, उत्तराषाढा, तिसरे, अंत्य | B.B.A. M.B.A. | पुणे येथे नोकरी | मा.प्रा.<br>--- | श्रीकांत मधुकर नाईक<br>कोथरूड, पुणे.<br>९९२३४९१८४९ |
| ९. | वैदेही<br>--- | देशस्थ ऋ. | २२/११/९८<br>५.६ | विश्वामित्र, धनु | M.Sc. | --- | वा.प्रा.<br>--- | श्रीकांत गोपाळ देशपांडे<br>सांगोला, सोलापूर<br>९५०३५८५०९७ |
| १०. | प्राची<br>--- | यजुर्वेदी | १७/१/९६<br>४.११ | वृश्चिक, अनुराधा चौथे, मध्य | B.Com. M.D.H. | स्वत:चा व्यवसाय | वा.प्रा.<br>२.५ लाख | ॲड. प्रकाश जोशी<br>पुणे.<br>९४०५८७३८९२ |

**वैष्णवी चिंतामणी सहस्त्रबुद्धे (कोकणथ) O +ve**

**जन्मतारीख :** २५/३/२००० **उंची :** ५.२ फूट

**शिक्षण :** BCA MBA (UK) (Fin. Analysis Exam. in May) State Level Badminton Player (Left Handed)

**इतर :** शिकत आहे व वडिलाचा व्यवसाय बघते.

**पत्ता : श्री. चिंतामणी सहस्त्रबुद्धे,** शिरोली पुलाची, कोल्हापूर. मोबा. 9604619100, 7385324480

**अपेक्षा :** निर्व्यसनी, उच्चशिक्षित,मुलीच्या करिअरला वाव

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| शांडिल्य | वृश्चिक | अनुराधा | तिसरे | मध्य | देव |

**मयुरी साने (कोकणस्थ) +ve**

**जन्मतारीख :** २/५/१९९९ **उंची :** ५ फूट

**शिक्षण :** B.E.(Prod.) PGDMC.Dac, Data Analyst,

**नोकरी :** पुणे येथे **वा.प्रा. :** ९ लाख

**अपेक्षा :** शाकाहारी, निर्व्यसनी, समजुतदार

**पत्ता : श्री. अतुल साने,** संभाजीनगर, कोल्हापूर. मोबा. 9422425235, 9890778567

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| कपि | वृश्चिक | विशाखा | चौथे | अंत्य | राक्षस |

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलांची माहिती - जुलै २०२६)

| अ. क्र. | वराचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | चैतन्य --- | देशस्थ ऋ. | २०/७/९७ ५.५ | भारद्वाज, मकर, उत्तराषाढा, तिसरे, अंत्य, मनुष्य | B.Com. | श्री महालक्ष्मी पुजारी, कोल्हापूर | वा.प्रा. अंदाजे २.४० लाख | आनंद मुनीश्वर मंगळवार पेठ, पोतनीस बोळ कोल्हापूर. ९४२३०४१४४० |
| २. | दीपक O +ve | कोकणस्थ | ९/२/९० ५.२ १/२ | कौशिक, कर्क, आश्लेषा, तिसरे, अंत्य | B.Com. | मुंबई येथे नोकरी | वा.प्रा. ३ ते ४ लाख | यशवंत भावे डोंबिवली पूर्व, ठाणे ९९६७३५२४०६ |
| ३. | अनिकेत --- | देशस्थ ऋ. | २३/१/९५ १६५ सेंमी | वत्स, कन्या, चित्रा, दुसरे मध्य, राक्षस | H.S.C. | दादर येथे नोकरी | वा.प्रा. २ लाख | अतुल गोपाळ जोशी मीरा रोड (इ.), ठाणे ९००४९६४७२१ |
| ४. | प्रसन्न --- | देशस्थ ऋ. | २४/९/९६ --- | विश्वामित्र, मकर धनिष्ठा, दुसरे मध्य, राक्षस | B.E. Mech. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ६ लाख | प्रकाश बिल्लुरकर कोल्हापूर. ९९२११९०३६४ |
| ५. | अमोल --- | देशस्थ ऋ. | २०/९/८८ ५.५ | शांडिल्य, धनु पूर्वाषाढा, पहिले मध्य, मनुष्य | BBA MBA | महालक्ष्मी बँक, कोल्हापूर. | वा.प्रा. २.७० लाख | सुहास माधवराव साकेकर कोल्हापूर. ९०२८७७०५५६ |
| ६. | आदित्य O +ve | देशस्थ ऋ. | १६/४/९७ ५.९ | वसिष्ठ, कर्क, आश्लेषा, तिसरे अंत्य, राक्षस | B.E. Mech. | आयबीएम पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ११ लाख | कमलाकर शंकर आराध्ये पुणे ८८०५५६७४७४ |
| ७. | प्रफुल्ल --- | देशस्थ ऋ. | २४/१०/९३ ५.७ | वसिष्ठ, मकर, धनिष्ठा, दुसरे मध्य, राक्षस | M.B.A. | सांगली अर्बन बँक सांगली | वा.प्रा. ३ लाख | दत्तात्रय व्यंकटेश सोनटक्के मु.पा.देवाळे, जि. कोल्हापूर ७५०७९५२८६८ |
| ८. | अनिकेत --- | देशस्थ ऋ. | २०/१०/९५ ५.४ | कौंडिण्य, सिंह पूर्वाफाल्गुनी, २ रे, मध्य, मनुष्य | B.E. Elect, | बाणेर येथे नोकरी | वा.प्रा. ५.५० लाख | दिगंबर पाटील नागाळा पार्क, कोल्हापूर, ९५५२५६४९९५ |
| ९. | शुभम --- | देशस्थ ऋ. | १८/११/९६ १७१ सेंमी | गार्ग्य, कुंभ, धनिष्ठा, चतुर्थ मध्य, राक्षस | M.B.A. (HR) | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ६ लाख | दत्तात्रय गोपाळराव कुलकर्णी नवी सांगवी, पुणे ९९२२९३३८०९ |
| १०. | दिपक --- | देशस्थ ऋ. | २७/७/९५ ५.६ | काश्यप, कर्क पुष्य, पहिले मध्य, देवगण | B.E. Mech. | गोवा येथे नोकरी | वा.प्रा. १५ लाख | शरद सदाशिव जोशी बाजारपेठ,क.वाळवे, राधानगरी कोल्हापूर. ७५८८४६९०१२ |

**अजिंक्य विजय कुलकर्णी (देशस्थ) B +ve**
**जन्मतारीख :** १४/१/९२ **उंची :** ५.५ फूट
**शिक्षण :** B.Com., M.Com. I
**नोकरी /व्यवसाय :** व्यवसाय **वा.प्रा. :** ६,३०,०००/-
**अपेक्षा :** सुशिक्षित,सुसंस्कृत, कोल्हापूर येथे राहण्याची तयारी
**पत्ता : श्री. विजय दत्तात्रय कुलकर्णी,** एफ-302,
ओम साई संकुल, वसंतराव जाधव पार्क, जरगनगर,
कोल्हापूर. मोबा. 9405263133, 8600647209

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| अगस्ती | मेष | भरणी | द्वितीय | मध्य | मनुष्य |

**आशीर्वाद अनंत कुलकर्णी (देशस्थ ऋ.) +ve**
**जन्मतारीख :** ९/८/१९९४ **उंची :** ५.८
**शिक्षण :** C.A. **नोकरी/व्यवसाय :** सी.ए.फर्ममध्ये नोकरी
**वा. प्रा. :** 6 लाख
**अपेक्षा :** शाकाहारी, नोकरी करणारी किंवा करण्याची इच्छा
**पत्ता : श्री. आशीर्वाद अनंत कुलकर्णी**
पाण्याच्या टाकीच्या शेजारी, कणेरकर नगर, कोल्हापूर.
मोबा. 9527312138, 7775827132

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| अत्री | सिंह | पूर्वा | तिसरे | मध्य | मनुष्य |



## भावपूर्ण श्रद्धांजली !

कोल्हापूर चित्पावन संघाच्या सभासद, हितचिंतक व आधारस्तंभ **विद्याताई रामचंद्र जोशी** यांचे सोमवार, दि. ८ जून २०२६ रोजी दुख:द निधन झाले. जोशी कुटुंबियांना आम्ही आमच्या लहानपणापासून बघत आलो आहे. विद्याताई, त्यांच्या आई सुधाताई जोशी आणि भगिनी उषाताई जोशी या तिघींनी मिळून पाळणाघर सुरू केले होते. जेणेकरून नोकरदार वर्गाला त्यांचा मोठा आधार मिळत होता. त्यांच्या पुरणपोळ्या देखील खूप प्रसिद्ध होत्या. या तिघींनी भरपूर कष्ट केले. त्यांची चाकोरीबद्ध जीवनशैली होती. आईच्या निधनानंतर देखील त्यांनी आपली दिनचर्या वरीलप्रमाणेच सुरू ठेवली होती. परंतु नंतर उषाताई देखील गेल्या. मात्र उषाताईंच्या निधनानंतर कोल्हापूर चित्पावन संघाने विद्याताईंची देखभाल केली. शेवटची तीन वर्षे त्यांना मायसावली केअर सेंटर मध्ये ठेवण्यात आले होते. तिथे देखील त्यांची चांगली काळजी घेण्यात येत होती. संघाचे संचालक आणि हितचिंतक वारंवार त्यांची विचारपूस करण्यासाठी मायसावली केअर सेंटरमध्ये जात असत. कोल्हापूर चित्पावन संघ आणि परिवार यांचेतर्फे विद्याताईंना भावपूर्ण श्रद्धांजली !

**केदार जोशी** (कार्यवाह) **प्रसाद भिडे** (उपाध्यक्ष) **मकरंद करंदीकर** (अध्यक्ष)

## कदंब पुरस्कार वितरण सोहळा





पाच समविचारी मैत्रिणींनी मिळून उत्तम काव्यसंग्रहासाठी ‘कदंब पुरस्काराची’ सुरवात केली आहे. त्यापैकी एक गौरी भोगले परदेशात आहेत. परदेशात ट्युलिप महोत्सव साजरा केला जातो, त्यावरून प्रेरणा घेऊन आणि अंगणातल्या कदंबाची आठवण म्हणून ह्या पुरस्काराचे नाव दिले आहे. नीलांबरी कुलकर्णी यांच्या अनौपचारिक प्रस्तावनेनं प्रसन्नता आणली. नंतर मंजुश्री गोखले यांनी सर्व मान्यवरांचा परिचय आणि काव्यसंग्रहाच्या निवडीचे अनुभव सांगितले. हळूहळू खुर्च्या भरून गेल्या होत्या. आता डॉ. कमलताई हर्डीकर बोलण्यासाठी उभ्या राहिल्या आणि मंत्रमुग्ध होऊन श्रोते ऐकत राहिले! पुरस्कार प्राप्त दोन कवी, पुण्याच्या दिपाली दातार (तळ्यातले आकाश) आणि नासिकचे स्वानंद बेदरकर(पावसाच्या गर्भतळी) यांच्या काव्यसंग्रहाबद्दल बोलताना, त्यांची मुखपृष्ठे आधी वाचली, त्यातल्या प्रत्येक कवितेचे अंतरंग, प्रत्येक भावभावनांचा रसिकतेने घेतलेला आस्वाद.. जणू खोल डोहात बुडून घेतलेला ठाव... ऐकतच रहावं.. असं विवेचन... वयाच्या ८६ व्या वर्षी, कोणत्याही शब्दाची, वाक्याची पुनरावृत्ती नाही, सलगपणे, सहजपणे कमलताई बोलत होत्या. याचसाठी.. याचसाठी आपण इथं आज आलोत, याचं पूर्ण समाधान वाटलं!

उकाड्याचा दाह खरंच कमी होत होता. अंगणातल्या मैफिलीत वारा झुळझुळ वाहू लागला होता. त्यानंतर दिपाली दातार यांनी (आयटी क्षेत्रात कार्यरत असूनही) कवितेची ओढ जपली आहे. काव्यसंग्रहातील कवितेमागची गोष्ट त्यांनी सांगितली. पहिल्याच काव्यसंग्रहाला पुरस्कार मिळाला त्याबद्दल समाधान व्यक्त केले. ज्यांच्या अल्प परिचयानं या कार्यक्रमाला मी गेले होते, ते नाशिकचे स्वानंद बेदरकर यांनी आपल्या अनवट लेखणीची वाट उलगडून दाखवली. एक अस्सल साहित्यिक सर्जनशील असतो, त्याची निर्मिती सतत नव्याच्या शोधात असते. शिवाजी विद्यापीठ मराठी विभाग प्रमुख डॉ. शिंदे यांनी या काव्यसंग्रहांचे अभ्यासपूर्ण विवेचन केले. व्यवसायाने अस्थीरोगतज्ञ असूनही लेखनाची आवड जोपासणारे डॉ. कुलकर्णी यांनी आपल्या हलक्या फुलक्या पण आशयपूर्ण कवितांनी वातावरण प्रसन्न केले. घरगुती चहा, खमंग वड्यांनी या सुंदर कार्यक्रमाची सांगता झाली. ‘आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने, शब्दांचीच शस्त्रे यत्ने करु...’ या तुकोबांच्या वाणीप्रमाणं आजच्या या सोहळ्याचं वर्णन करावं लागेल.असा अनौपचारिक, उत्तम, दर्जेदार कार्यक्रम सादर होणं, ही आपल्या मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि रसिक वाचकांसाठी पर्वणी आहे. या कार्यक्रमानंतर डॉ. कमल हर्डीकर यांचा ८६ वा वाढदिवस साजरा केला. औक्षण, केक, साडी भेट, या सगळ्या क्षणांची मी साक्षीदार झाले, याचा खूप आनंद झाला ! प्रेक्षकांची गर्दी नाही, तर दर्दी रसिकांची गर्दी आहे, असं म्हटलं, तर आपण त्यातले एक आहोत, याचा उगीच अभिमान वाटून गेला...

पुन्हा पुढच्या वर्षी कदंब कार्यक्रमाला आवर्जून यायचं, हा प्रेमळ आग्रह आणि ‘अधिकाचं सुंदरसं वाण’ घेऊन घरी आले.. सर्व कदंब परिवारांचे मनापासून आभार ! – सौ. अनिता सातारकर

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2025-2027




प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी
मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल,
गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.